श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक.

वर्ष १० अंक ८-९] कार्तिक, मार्गशीर्ष [श. १८५५

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम्



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका

—शंकराचार्य.

संपादक:—रामचंद्र आत्माराम तर्खड.

# अनुक्रमणिका


| | पृष्ठें |
|---|---|
| श्रीसमर्थसद्गुरु साईबाबा महाराज यांच्या पुण्यतिथि-उत्सवाचा वृत्तान्त ... ... ... | १-१० |
| पुण्यतिथि-उत्सवाच्या जमाखर्चाचा तपशीलवार हिशोब ... | ११-१९ |
| पुण्यतिथि-उत्सवाच्या वर्गणीदारांच्या नांवांची रक्कमवार यादी ... ... ... | २०-३१ |
| शिर्डीवृत्त ... ... ... ... | ३२-३५ |
| अनुभव ... ... ... ... | ३६-३७ |
| शंभर नंबरांच्याही पलीकडील दक्षिणा ... ... | ३८-४८ |
| श्रीसंतकथामृत अध्याय २०, २१ आणि २२ ... ... | १४२-१६४ |


## विनंति.

वर्गणीदारांस नम्र विनंती करण्यांत येत आहे कीं, या सालीं V. P. करण्यांत आली नसल्यामुळें ज्यांनीं वर्गणी अद्यापी पाठविली नाहीं त्यांनीं कृपा करून ती खालील पत्त्यावर पाठवून द्यावी. अथवा V. P. करण्याचें सुचवावें.

**रा. आ. तर्खड.**

व्यवस्थापक--**श्रीसाईलीला**

५१ E. पार्ला रोड, खार, मुंबई २१; आणि ऑ. खजिनदार

**श्रीसाईबाबा शिरडी संस्थान.**

सुप्रसिद्ध श्री. मोरोपंत कविकृत **केकावलि** या भक्तिरसप्रेमामृतें ओथंबलेल्या काव्यावर कै. रा. ब. दादोबा पांडुरंग यांची "यशोदा पांडुरंगी" टीका जी साठ वर्षांपूर्वीं छापून प्रसिद्ध झाली होती व आजमितीस अत्यंत दुर्मिळ झाली होती तिची दुसरी आवृत्ति छापून तयार झाली आहे. किं. रु.

**रा. आ. तर्खड,**

व्यवस्थापक —**श्रीसाईलीला कचेरी**

## श्रीसाईभक्तांस विज्ञप्ति.

कोणाला श्रीसाईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्रीसाईलीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते आमचेकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

**रा. आ. तर्खड,**

— प्रकाशक.

श्रीदत्तचित्साईसद्गुरुभ्योंनमः

# शके १८५५ सालच्या श्रीक्षेत्र शैलधी (शिरडी) येथील श्रीसमर्थ सद्गुरु साईबाबामहाराज यांच्या पुण्यतिथिउत्सवाचा वृत्तांत, जमाखर्च व उत्सवास वर्गणी देणाऱ्या भक्तांची नांवनिशीवार व रक्कमवार यादी

श्रीसाई लीला संपादक महाशय यांस प्रेमपूर्वक कृ. शि. सा. नमस्कार वि.वि.

शके १८५५ आश्विन शु. १० गुरुवार (ता. २८-९-३३) पासून आश्विन शु. १३ रविवार (ता. १-१०-३३) पर्यंत चार दिवसांतील उत्सवाचा, सोमवारीं असलेल्या कोजागरी पौर्णिमेचा, व मंगळवारीं असलेल्या नवान्नपौर्णिमेचा साद्यंत वृत्तांत, जमाखर्च व नांवनिशीवार व रक्कमवार वर्गणी देणाऱ्या भक्तांची यादी प्रथम अनंत साष्टांग प्रणिपातपूर्वक, नितांत प्रेमभक्तिपुर:सर, अत्यादरानें व अत्यंत विनयानें श्रीसद्गुरुचरणपंकजीं निवेदन करून, नंतर तितक्याच विनयतेनें व आदरानें जनीजनार्दनास विश्रुत होण्याकरितां आपल्याकडे पाठवीत आहें; तरी आपल्या विबुधमान्य श्रीसाई-लीलेच्या एखाद्या अंकीं त्यास प्रसिद्धि मिळण्याबद्दल विनंती आहे.

गेल्या तीन वर्षांप्रमाणें ही गोड व प्रिय कामगिरी संस्थानकमिटीनें मजकडे सोंपविली. ती मीं आनंदानें पत्करिली, व श्रीसमर्थ सद्गुरुमाउलीनें ती शेवटास नेली.

## बाहेरगांवची आलेली पाहुणे मंडळी

सालाबादप्रमाणें उत्सवकार्यासाठीं या वर्षी ठाण्याहून श्रीदेव शिरडी संस्थान विश्वस्त सहकुटुंब, नातू श्री. मधुकर ऊर्फ जगन्नाथ व बांद्र्याहून

मदतकोशाध्यक्ष श्री. रघुवीर भास्कर पुरंदरे आश्विन शु. ३ पासून शिरडीस येऊन राहिले होते. पुण्याहून शु. ५ रविवार रोजीं श्री. सीताराम पोवार हे एकटेच येऊन दाखल झाले. श्री. सौ. लक्ष्मीबाई ऊर्फ वहिनीसाहेब गाडगीळ यांनी प्रथम येण्याचें कबूल केलें होतें. परंतु पावसांत पाय घसरून पडल्याचें निमित्त होऊन त्यांच्या पायास मोठीच दुखापत झाली; त्यामुळें त्यांना उत्सवास मुळींच येतां आलें नाहीं. आम्हां सर्वांस पदोपदीं त्यांची आठवण होऊन फारच उणीव भासली. तथापि श्री सीताराम पवार यांनी पुष्कळच बाजू संभाळली. बाबांची इच्छा ! उत्सवाच्या पूर्व दिवशीं व उत्सवदिवसांत खालीं लिहिल्याप्रमाणें मंडळी जमली होती.

ठाणें—श्री. बालकृष्ण विश्वनाथ देव, कुटुंब, नातू जगन्नाथ, चिरंजीव श्रीपाद व श्रीनिवास यांसह

„ „ गोपाळ भास्कर दातार, वकील

„ „ काशीनाथ पांडुरंग कुलकर्णी, हेड क्लार्क डि. लो. बो.

मुंबई— „ हरेराम ३ मंडळीसह

„ „ मधुसूदन धोंडू कांबळी, सहकुटुंब

„ „ दत्तात्रय राजाराम राणे

„ सौ. चंद्राबाई बोरकर

„ श्री. वसंतराव नारायण गोरक्षकर

„ „ कृष्णराव पुंरदरे

„ „ नागेश आत्माराम सावंत, पोलिस स. इ., सहकुटुंब सहपरिवार

„ „ गणपत आत्माराम कीर्तिकर

„ „ रामकृष्ण श्रीकृष्ण नवलकर, ॲडव्होकेट, मुंबई हायकोर्ट

„ „ रतनबाई पारशी, २ मंडळीसह

„ „ हरि जनार्दन निंबकर, आचारी व त्यांचे चुलते

„ „ रघुनाथ नारायण जोशी, आचारी

दादर— „ आत्माराम तुकाराम टाकळे

„ „ दादाजी गोपीनाथ जोशी, सहकुटुंब

भुसावळ--,, गोविंद विनायक वाड, हेडक्लार्क, सहकुटुंब सहपरिवार
पारनेर-- ,, गणेश शिवराम पाटणकर, सबरजिस्टर
पुणें-- ,, गोविंद काशीनाथ ऊर्फ आपासाहेब गाडगीळ, बॅरिस्टर
,, ,, सीताराम बाबाजी पवार
,, ,, सुरेंद्र आत्मारामसहकुटुंब
आळंदी--,, मोडकबुवा, ज्ञानेश्वरीप्रवचनकार व कीर्तनकार
कोपरगांव--,, रावसाहेब मामलेदार, मातुःश्री व सौ. सुनबाई, कारकून तलाठीसह
कुर्ला-- ,, शांताराम बलवंत नाचणें
बांद्रें-- ,, अर्जुन बाळकृष्ण सावंत
,, ,, रघुवीर भास्कर पुरंदरे, मदतकोशाध्यक्ष, शिरडी सं.
अहमदनगर--,, दामोदर सावळेराम ऊर्फ दामुआण्णा राशने
,, ,, आर. बी. राशने
,, ,, विठ्ठल बाळाजी कुंभकर्ण, कासार
दौंड-- ,, विष्णु गोविंद देव, रेंज फॉरेस्ट आफिसर, सहकुटुंब सहपरिवार
तांदुळवाडी--,, ह. भ. प. विश्रामबुवा कीर्तनकार, १० मंडळीसह
शिरवळ-- वे. मू. दत्तात्रय पांडुरंग मोवे
खार-- ,, रामचंद्र आत्माराम तर्खड, शिरडी संस्थान कोशाध्यक्ष
सांताक्रूझ--,, रावबहादुर मोरेश्वर विश्वनाथ प्रधान, शिरडी संस्थान विश्वस्त
साकुरली--,, गोविंद कमलाकर दीक्षित
निमगांव--,, भागवत
,, ,, मार्तंड भट
नाशिक--,, नाशिककर ब्राह्मण आचारी
,, श्रीमती लिंगाईतबाई

या उत्सवकार्यांत अति आस्थेनें, प्रेमळपणानें व दक्षतेनें कामगिरी करणाऱ्या सौ. बहिनीसाहेब गाडगीळ यांचें अगदीं आयत्या वेळीं नाइलाजा-

स्तव येणें झालें नाहीं, याबद्दल दिलगिरी वाटते. तथापि अखेरपर्यंत बहुतेक बाजू बहिर्नासाहेबांचे प्रामाणिक व कामसु नोकर श्री. सीताराम पवार यांनीं चांगलीच संभाळली, म्हणून वर लिहिलेंच आहे. श्री. बाबासाहेब तर्खड व मोरेश्वरराव प्रधान वगैरे मंडळी मंगळवारीं मुंबईकडे रवाना झाली. श्री. देव, श्री. पुरंदरे व श्री. सीताराम पवार ही मंडळी कोजागरी पौर्णिमा व नवान्नपौर्णिमा यांचा समारंभ आटोपून, शिलकी राहिलेल्या सामानाची व देण्याघेण्याची सर्व व्यवस्था लावून रविवारीं अनुक्रमें ठाण्यास व पुण्यास निघून गेली.

## कीर्तनें व पुराणें

चालू सालीं ह. भ. प. विश्रामबुवा तांदुळवाडीकर हे पुण्यतिथीच्या दिवशीं म्हणजे शुक्रवारीं ८-९ वाजतां आपल्या १० टाळकरी मंडळीच्या लवाजम्यानिशीं दाखल झाले. पुण्यतिथीच्या आदल्या दिवशीं विजयादशमी व गुरुवार असल्यामुळें शिरडी संस्थानचे नूतन नियोजित गवई श्री. शिरवळकर देशपांडेबुवा यांनीं सकाळीं १० ते १२ पर्यंत कीर्तन केलें. शुक्रवारीं श्री. देव यांनीं गेल्या २-३ सालांप्रमाणें पुण्यतिथीचें कीर्तन १० ते १ पर्यंत बाबांच्या कृपेने कसेंबसें करून वेळ मारून नेली. त्याच दिवशीं रात्रीं श्री. विश्रामबुवांचें कीर्तन श्रींच्या समाधिमंदिराच्या नजीकच्या उघड्या भव्य पटांगणांत त्यांच्या नेहमींच्या भाषेंत दृष्टांतांत व नेहमींच्या रिवाजाप्रमाणें गांवच्या व आजुबाजूच्या अफाट लोकसमुदायापुढे झालें. शनिवारीं सायंकाळीं समाधिमंदिरांत गवईबुवांचें कीर्तन झालें. त्या रात्रीं पर्जन्यराजाच्या वक्रदृष्टीमुळें विश्रामबुवांचें कीर्तन झालें नाहीं. रविवारीं सकाळीं १० ते १ पर्यंत गवईबुवांनीं काल्याचें कीर्तन केलें. दुपारीं श्रीअलकापुरी ( आळंदी ) क्षेत्रनिवासी मोडकबुवांचें श्रींच्या समाधीसमोर श्रीज्ञानेश्वरी अध्याय १८ श्लोक पहिला ' संन्यासीं व त्याग ' या विषयावर सुश्राव्य प्रवचन झालें. त्याच रात्रीं श्री. विश्रामबुवांचें मंदिरानजीकच्या उघड्या पटांगणांत कीर्तन झालें. सोमवारीं सायंकाळीं श्री. बापाजी लक्ष्मण कुलकर्णी यांचें समाधिमंदिरांत कीर्तन झालें. त्याच रात्रीं विश्रामबुवांचें नेहमींच्या ठिकाणीं कीर्तन झालें. मंगळवारीं व बुधवारीं रात्रीं

विश्रामबुवांचें कीर्तन, एक श्रीद्वारकामाईत व एक नेहमीच्या पटांगणावर झालें. गुरुवारीं रात्रीं समाधिमंदिरांत गवईबुवांचें कीर्तन झालें. श्रीज्ञानेश्वरीवर श्री. देव यांचीं एकंदर ६-७ प्रवचनें झालीं.

याप्रमाणें उत्सवदिवसापूर्वी, उत्सवदिवसांत व उत्सवदिवसांनंतर एकंदर मिळून १३ कीर्तनें झालीं व ८ प्रवचनें झालीं.

यांत श्री. देव अनभ्यस्त व अपरिपक्व, बाबाजी साधारण व परावलंबी; गवईबुवा व विश्रामबुवा वारकरी संप्रदायांतील कसलेले कीर्तनकार. उभयतांचाही भक्तिरसप्राधान्य श्रीतुकाराममहाराजांच्या अभंगांवर मुख्यत्वें भर. विश्रामबुवांना वेदांत प्रिय, तर गवईबुवांना गायन व ज्ञानेश्वरी प्रिय. कीर्तन ही श्रीनारदमुनींची अत्यंत पवित्र गादी. तींत संसार सुखमय होऊन आत्यंतिक व शाश्वत् सुखस्थान जें परमात्मपद त्याकडे साधुसंतांच्या अमोल उपदेशानें भ्रमिष्ट व गोंधळून गेलेल्या समाजाचें मन वेधणें हा अत्युच्च हेतु आहे. समाजसुधारणेच्या अगडबंब नांवाखालीं एकमेकांची निंदा, नालस्ती, राजकरण किंवा शास्त्रांची अमर्यादा करण्याचीं कीर्तनें व प्रवचनें हीं स्थळें नव्हत, व कीर्तन व प्रवचनकारांचें हें कर्तव्यही नाहीं. कर्तव्यपराङ्मुख कीर्तनकार व प्रवचनकार स्वतःस व समाजास अधोगर्तास मात्र नेतात. तरी कीर्तनकारांनीं व प्रवचनकारांनीं या गोष्टीकडे दुर्लक्ष करूं नये, अशी त्यांना माझी प्रेमाची विनंती आहे.

## कार्यक्रम

उत्सवाचा कार्यक्रम पूर्वीच्या अंकांत छापून प्रसिद्ध झाला आहे. त्याची द्विरुक्ति येथें करीत नाहीं. जरूरीप्रमाणें कार्यक्रमांत फारच थोडा फेरफार करण्यांत आला.

## भोजनपात्रें

विजयादशमी गुरुवारपासून पाहुणेमंडळी येऊं लागली. त्या दिवशीं दोन्ही वेळां मिळून सुमारें १५० पान झालें. शुक्रवारीं दोन्ही वेळां मिळून

अजमासें ६०० पात्र झालें. शनिवारीं दोन्हीं वेळां मिळून अजमासें १२५ पात्रें झालीं. रविवारीं दोन्हीं वेळां मिळून व भंडाराभोजन मिळून अजमासें १००० पान झालें. सोमवारीं कोजागरी पौर्णिमा व मंगळवारीं नवान्नपौर्णिमा होती. दोन्ही दिवशीं प्रत्येकीं ५०–६० पानें झालीं.

चालू सालीं कोजागरी पौर्णिमा दरसालप्रमाणें थाटाची झाली. या दिवशीं सायंकाळीं श्री. बापाजी कुळकर्णी यांचें कीर्तन झालें. रात्रौ यथाविधि श्रींची पूजा व तुलसीसहस्रनाम होऊन सुमारें १२ वाजतां श्री. विश्रामबुवांचें कीर्तन आटोपल्यावर सुमारें २०० मंडळींची गर्दी मंदिरांत झाली. नारळ, नारळाचें पाणी, पोहे, पेढे, तापविलेलें शर्करामिश्रित दूध, खडीसाखर, लाह्या वगैरे पदार्थांचा श्रींस नैवेद्य समर्पण केल्यावर, श्रीनिशापती चंद्रमाची पूजा झाली. नंतर ब्राह्मणास भूयसी व जमलेल्या सर्व मंडळीस तीर्थप्रसाद दिल्या-नंतर श्री. देव यांनीं श्री. व्रतराजाचे पोथीवरून या पौर्णिमेची कथा सांगून या पौर्णिमेस कोजागर हें नांव कसें प्राप्त झालें व या रात्रीं द्यूत खेळणें कसें शास्त्रसंमत आहे हें समजाऊन सांगितलें. नंतर पुष्कळशी मंडळी चार घटका सारीपाट (सोंगट्या) खेळून रात्रीं ३ वाजतां आपापल्या घरीं गेली.

## भोजनाचा बेत

उत्सव दिवसांत भोजनास २ भाज्या, दोन चटण्या, अमटी, मठ्ठा, लिंबू, भात, वरण, तूप, पांढरी पोळी व शिरा होता. पहिले दोन दिवस श्रींच्या नैवेद्या-पुरतीं व आराधनाविधीच्या ब्राह्मणांपुरतीं पंचपक्वान्नें होतीं. चारी दिवस गुळाचा शिरा यथेच्छ होता. भंडाराभोजनासही गुळाचा यथेच्छ शिरा होता. मध्यंतरीं व कोजागरीस व नवान्नपौर्णिमेसही शिरा केला होता. शिऱ्याचें पक्वान्न मुबलक व पोटभर होतें. ताक भरपूर होतें. या उत्सवांत मदत (सेक्रेटरी) सचिव श्री. बापूराव बोरावके यांना कार्याबाहुल्यामुळें, भोजनास व इतर कोणत्याही कामास येतां आलें नाहीं. त्यांना, तात्याबा पाटील कोते, संस्थान-विश्वस्त, माधवराव बळवंत देशपांडे संस्थानसभेचे सभासद व संस्थानचे सर्व

नोकरचाकर मंडळी या सर्वांना उत्सवाच्या चार दिवसांत भोजनाचें निमंत्रण केलें होतें.

## भिक्षा

चालू सालीं पुण्यतिथीच्या दिवशीं व त्याच्या आधल्या दिवशीं सकाळीं श्रींच्या नांवाचा जयघोष करीत व्यवस्थापक व इतर भक्तमंडळींनीं गांवांत भिक्षा मागितली.

## अभिषेक व आराधनाविधि

सालाबादप्रमाणें चालू सालीं श्रींच्या आराधनाविधिकरितां भोर संस्थानांतील शिरवळ गांवचे संतवर्य श्रीसमर्थ सद्गुरु मोरभट्ट आर्यमोने यांच्या बंधूचे नातू वे. मू. रा. दत्तात्रय पांडुरंग ऊर्फ बगोबा मोने या माहितगार गृहस्थांना आणण्यांत आलें होतें. त्यांनीं आराधनाविधि यथाशास्त्र पार पाडून श्रींच्या समाधीवर लघुरुद्र व पवमान लघुरुद्र यांचे अभिषेक केले. जमलेल्या भक्तबांधवांकडूनही श्रींच्या समाधीवर एकंदर तीन रुद्र, लघुरुद्र व ३६ एकादशिण्या झाल्या. लघुरुद्राचें व एकादशिण्यांचें महत्त्व भक्तवृंदांत बरेंच ज्ञात होत चाललें आहे ही आनंदाची गोष्ट आहे.

## फुलबाग

या फुलबागेसंबंधानें मी प्रत्येक वर्षीं लिहीत आहें तरी याबद्दल पुनः पुनः आणखी लिहावेंसें वाटतें. ही जागा ज्या रा. ब. मोरेश्वरराव प्रधानांनीं ज्या सद्धेतुकरतां घेऊन दिली, तो त्यांचा हेतु विलंबानें का होईना, पण पूर्ण सिद्धीस गेला. काय त्या रावबहादुरांच्या कुटुंबाचें पारमार्थिक भाग्य, कीं त्यांनीं सत्यांयशीं अधिक शंभर मैलांच्या लांबीवर असणाऱ्या सांताक्रूस शहरीं आपल्या बाडयांत बसून इकडे पुण्यक्षेत्र शैलधींत श्रीसाइपरमात्मानें अहोरात्र आपल्या दिव्य समाधिरूप शरीर, रावबहादुरांच्या पुष्पवाटिकेंतील किंवा सुमनारामांतील भव्य, तेजस्वी, व मोहक अशा भेंडी गुलाब, देशी गुलाब,

गुलछडी, शेवंती वगैरे मधुर, सुगंध, शीतल कुसुमांनीं, सबजा, जयंती, विष्णुतुळसींनीं मंडित करून घेऊन त्याच कुसुमारामातील वृक्षफलांचा नैवेद्य घेऊन, त्यांच्या पूजेचा स्वीकार करावा ! ! असो. या बागेपासून आमच्या-सारख्या आगंतुकांचीही चांगलीच सोय झाली आहे. बाबांच्या जेकरितां यथेच्छ ताजीं फुलें व तुळसी मिळतात, व बागेंतील फलनैवेद्याचा सुंदर प्रसाद मिळतो. या सालींही अतिवृष्टीमळें बागेंतील विशेषेंकरून शेवंतीच्या फुलांचें फारच नुकसान झालें. बागेची उत्तम व्यवस्था ठेवल्याबद्दल श्री. सगुणराव नाईक यांची व फुलबागेस जागा दिल्याबद्दल रा.ब. प्रधान यांची संस्थानसभा फार आभारी आहे. श्री उभयतांचें कल्याण करोत, अशी श्रीचरणीं नम्र प्रार्थना आहे.

## संत श्री. भाऊराव कुंभार

कोणी दुष्टानें मारल्यामुळें भाऊराव कुंभार या उत्सवांत शिरडीस आलेच नाहीत. आम्ही पुष्कळ वाट पाहिली, पण व्यर्थ ! असो.बाबांची मर्जी. उत्सवानंतर श्री. भाऊराव शिरडीस आले. त्यांना एक उपरणे रा. बाळ पिलाजी गुरव यांच्या हस्तें अर्पण करण्यांत आलें.

## औदार्य

चालू सालीं श्रीगोदावरी कॅनॉलच्या शिरडीजवळील कांहीं भागाचे ओव्हरसियर श्री. आठवलेसाहेब हल्लीं वस्ती शिरडी यांनीं शिरडी शाळेंतील व इतर मुलांस व इतर मंडळीस भात, अमटी,चटणी, भाजी यांचें श्रींच्या समाधि-मंदिरांत भोजन दिलें. सुमारें ३००–४०० पान झालें.

सौ. जानकीबाई देव यांनीं चातुर्मास्य-नियमसमाप्तिप्रीत्यर्थ श्रींच्या समाधिमंदिरांत श्रींस नैवेद्य करून श्री. देशपांडे गवईबुवांस सहकुटुंब व इतर सुमारें ५० मंडळीस शिऱ्याचें भोजन दिलें. गवईबुवास पोशाख दिला, कांहीं बायकांना लुगडीं दिलीं व हळदकुंकूं दिलें व मुलांना पाकवलेले काजू वांटले.

## देणगी

या उत्सवांत सालाबादप्रमाणें कांहीं नोकर, अनाथ व गरीब मंडळींना पैसे व वस्त्रें दिलीं. त्यांचीं नांवनिशीं सोबतच्या जमाखर्चाच्या यादींत दिलीं आहे.

## आभार

या सर्व उत्सवकार्यांत श्री. माधवराव बळवंत देशपांडे, त्यांचे उभयतां चिरंजीव, सुशील स्नुषा सौ. राधाबाई, श्री. तात्याबा पाटील कोते, श्री. रघुवीर भास्कर पुरंदरे, श्री. आप्पासाहेब गाडगीळ, श्री. सीताराम पवार, श्री. बाळा पिलाजी गुरव, श्री.नाना चोपदार, बापाजी कुळकर्णी, श्री.भागवत व संस्थानची इतर नोकरचाकर मंडळी यांनीं हरएक प्रकारें मेहनत घेऊन उत्सव, कोजागरी नवान्नपौर्णिमा वगैरे कार्यक्रम निर्विघ्नपणें पार पाडले व श्री. गणपतराव देशपांडे शिरवळकर गवईबुवा यांनीं आपल्या सकाळचें सुस्वर शास्त्रयुक्त गायन, दुपारचें श्रीज्ञानेश्वरी आदिकरून इतर परमश्रेष्ठ जगविख्यात चार ग्रंथांचें प्रवचन, सायंकालचें सतारवादन, रात्रौ सुस्वर भजन व उत्सवपूर्वी, उत्सव दिवसांत व नंतर कीर्तन करून, तसेंच ह. भ. प. विश्रामबुवा यांनीं रात्रीचीं कीर्तनें करून, व श्री. मोडकबुवांनीं ज्ञानेश्वरीवर प्रवचन करून उत्सवास शोभा आणिली, त्याबद्दल या सर्वांचे उत्सवव्यवस्थापक फार फार आभारी आहेत.

## जमाखर्च

सोबत जमाखर्चाची यादी, तसेंच ज्या भक्तांकडून या उत्सवकार्यासाठीं वर्गणी आली, त्यांची नांवनिशीवार व रक्कमवार यादी जोडली आहे.

## प्रार्थना

उत्सवकार्यक्रमांत सेवकाकडून व इतर कार्यकर्त्या मंडळीकडून ज्या ज्ञात किंवा अज्ञात चुका झाल्या असतील, त्यांची श्रीसाईपरमात्म्यांनीं क्षमा करून उत्सवास आलेल्या सर्व भक्तवृंदावर, उत्सवांत प्रत्यक्ष काम करणाऱ्या भक्तजनांवर, व उत्सवांत हजर न राहतां द्रव्यद्वारा अगर अन्य नव्हेनें उत्स-

वास मदत करणाऱ्या भक्तसमूहावर व दीन सेवकावर अखंड कृपादृष्टि ठेऊन या दास बालकाकडून अशीच निरंतर सेवा घेण्याचा त्यावर प्रसाद व्हावा, अशी त्यांच्याच पुण्यात्रिनीरजीं विनम्र प्रार्थना करून हा वृत्तांत संपवितों.

मालिनीवृत्तम्

त्वमसि भुवनसम्राट् त्वं सतां चक्रवर्ती ।
त्वमसि च पितरौ मे त्वं च सर्वस्वमेव ।
तव मधुरतमेऽस्मिन् ह्युत्सवे पुण्यतिथ्याः ।
शिशुकृत लघुसेवां सद्गुरो स्वीकुरुष्व ।

ठाणें,
गुरुवार, कार्तिक कृ. ९
शके १८५५, श्रीमुखनाम
संवत्सरे, ता. ९-११-३३

श्रीचरणरजदासानुदास,
**बाळकृष्ण विश्वनाथ देव**
शि. सं. पुण्यतिथ्युत्सव व्यवस्थापक-
विश्वस्त.

श्रीदत्तचित्साई सद्गुरुभ्योनमः

# शके १८५५ सालच्या श्रीसमर्थ सद्गुरु साईबाबा-महाराजांच्या पुण्यतिथिउत्सवाच्या जमाखर्चाचा तपशीलवार हिशोब

| जमा | | खर्च | |
|---|---|---|---|
| रु. आ. पै. | | रु. आ. पै. | |
| ०–०–० | मागील वर्षाची शिल्लक | ६–५–० | चहा |
| ४००–०–० | श्री. रामचंद्र आत्माराम | ०–८–० | कॉफी |
| | ऊर्फ बाबासाहेब तर्खड, | ३४–०–० | तांदूळ |
| | खजिनदार, शिरडी संस्थान | ६२–१५–६ | तूप |
| | यांजकडून खर्चाकरितां | ८–३–६ | गोडें तेल |
| | घेतलेली आगाऊ रक्कम | ३१–८–० | साखर |
| ६८५–१–३ | उत्सवकार्यासाठी ठिक- | ५–१३–० | साखऱ्या |
| | ठिकाणांहून आलेली | २२–१५–९ | गूळ |
| | वर्गणी | १०–८–० | गहूं |
| | ५२७–३–३ श्री. बाबा- | १३–१०–० | रवा ( गव्हाचा रवा ) |
| | साहेब व श्री. सुंदरराव | १–१–६ | कणीक |
| | नवलकरमार्फत | ६–१–० | तुरीची डाळ |
| | | ४–१४–६ | चण्याची डाळ |
| | ६७–१०–० श्री. देवमार्फत | ०–२–३ | चण्याच्या डाळीचें पीठ |
| | ६०–४–० श्री. पुरंदरे मा. | ०–०–६ | मुगाची डाळ |
| | १३–०–० श्री. आपा- | १–२–० | खोबरें |
| | साहेब गाड- | २–०–० | मीठ |
| | गीळमार्फत | १–९–० | तांबडें तिखट |
| | ६–०–० श्री. तात्याबा | ०–३–० | दालचिनी |
| | पाटील कोते | १–९–० | हळद |
| | मार्फत | ०–३–० | कारळे ( काळे ) तीळ |
| | ११–०–० श्री. बाळा | ०–३–० | जवस |
| | चिलाजी गुरव- | ०–६–० | शहाजिरें |
| | मार्फत | १–९–० | मसाला |
| ६८५–१–३ | | २१७–६–६ | |

**जमा**

| रु. आ. पै. | | |
|---|---|---|
| ६८५--१-३ | | |
| १९--४--९ | भिक्षेचें उत्पन्न | |
| | ८-१२-० | रोख |
| | ३--८--० | गहूं |
| | १--३--६ | बाजरी |
| | ०--९--० | जोंधळे |
| | ४--६--० | तांदूळ |
| | ०--७--६ | कणीक |
| | ०--१--३ | चणे |
| | ०--१--० | मीठ |
| | ०--४--६ | तुरीची डाळ |
| | १९-४-९ | |
| ४२- ८-० | पेट्यांतील उत्पन्न. | |
| | ३६-१३-३ | मंदिर-पेटी |
| | ५-१०-९ | द्वारकामाई-पेटी |
| | ४२-८-० | |
| २३- २-० | शिल्लक राहिलेल्या सामानविक्रीचें उत्पन्न | |
| ११७०- ०-० | | |

**खर्च**

| रु. आ. पै. | |
|---|---|
| २१७—६—६ | |
| २—१—० | हिंग |
| ०—४—० | मोहरी |
| ०—८—० | जिरें |
| ०—४—० | चिंच |
| ०—४—० | लवंगा |
| ०—१—० | आमसुलें |
| १—६—० | नारळ |
| ०—१—० | खसखस |
| २—८—० | केशर |
| ०—१—० | जायपत्री |
| ०—८—० | वेलदोडे |
| ०—७—० | शदाम व बदाम बी |
| ०—२—० | बेदाणा |
| १—५—० | धन्याची भगर |
| ६—०—० | शेंगादाणे |
| २—४—० | साबूदाणे |
| ६—८—० | भाजी-बटाटे,डांगर वगैरे |
| ०—३—० | आलें, हिरवी मिरची |
| ३५—०—० | दूध, कोजागरीसुद्धा |
| ०—७—० | विड्याचीं पानें |
| १—०—० | सुपारी |
| ०—५—० | कात |
| १२—०—० | सर्पण लांकडें |
| ०—२—० | चूल |
| ६—०—० | पत्रावळी |
| १—८—० | द्रोण |
| ८—७—० | घासलेट |
| ०—१—० | काड्या |
| २—०—० | बत्ताशासाखर, श्री नैवेद्याकरतां |
| ३०८-१५-६ | |

जमा

रु. आ. पै

## खर्च

| रु. आ. पै | |
|---|---|
| ३०८–१५–६ | |
| २–०–० | काजू पाकविलेले श्रींच्या नैवेद्याकरतां |
| ३–०–० | पेढे, श्रींच्या नैवेद्याकरतां |
| २–८–० | पोहे, चिवड्याकरतां व कोजागरी पौर्णिमेकरतां |
| ०–१–० | अगपेट्या |
| ०–१–० | मडकें |
| ०–१०–० | गुलाल |
| १–०–० | रांगोळी |
| ६–८–० | आराधनाविधि चार ब्राह्मणांस व तीर्थराजास दक्षिणा |
| १–११–० | आराधनाविधि चार ब्राह्मणांस व तीर्थराजास ५ धोतरें व ५ उपरणीं |
| ५–८–० | श्रींच्या समाधीवर केलेल्या रुद्रलघुरुद्रांची दक्षिणा |
| ५–८–० | श्रींच्या समाधीवर केलेल्या पवमान-लघुरुद्रांची दक्षिणा |
| ८–१२–० | आराधनाविधि चालविणाऱ्या ब्राह्मणांचें जातांयेतांचें भाडें |
| १–०–० | श्रींच्या श्यामसुंदर घोड्यास दसऱ्याची ओंवाळणी |
| ५–०–० | उत्सवदिवसांतील पांच दिवसांची दक्षिणा |
| ३६०–२–६ | |

| जमा रु. आ. पै | खर्च रु. आ. पै | |
|---|---|---|
| | ३६०—२—६ | |
| | २—०—० | भोजन व भूयसी दक्षिणा |
| | १—४—० | श्रीच्या श्यामसुंदर अश्वास पांच दिवसांचें गवत |
| | ०—०—० | भिक्षेपैकीं चणें, जोंधळे बाजरी वगैरे धान्य. श्यामसुंदर अश्वास दिलें, |
| | ३—०—० | हारतुरें, मजुरी, रेल्वेभाडें |
| | १—०—० | कोपरगांव व नगर वगैरे ठिकाणचा किरकोळ खाणें-खर्च |
| | १—४—० | भंडाराभोजन स्वयंपाक मजुरी |
| | १—०—० | कढई मजुरी |
| | १—४—० | भंडाराभोजन गहूं-दळणाची मजुरी |
| | ६—१२—० | उत्सवांत काम करणाऱ्या पुरुष-स्त्रियांची मजुरी |
| | १—८—० | परीट-मजुरी |
| | ७१—१४—० | आचारी-मजुरी जातां-येतांच्या भाड्यासह, श्री. हरिभाऊ निमकर, त्यांचे चुलते व रघुनाथ जोशी मिळून. |
| | ३—०—० | भंगी दिवस ५ |
| | १२—१४—० | मोटरभाडें |
| | ३—०—० | बैलगाडी-भाडें |
| | ३—६—० | टांगा-भाडें |
| | १—६—० | नांव-भाडें |
| | २१—७—० | रेल्वे-भाडें |
| | ४—५—६ | हमाली |
| | ५०६—७—० | |

| जमा | खर्च | |
|---|---|---|
| रु. आ. पै | रु. आ. पै | |
| | ५०६—७—० | |
| | ५— ०—० | श्रीविठ्ठलमंदिरास मदत म्हणून श्री. बापाजी लक्ष्मण कुलकर्णी यांस दिले |
| | ३५— ०—० | श्री. ह. भ. प. विश्रामबुवा यांना देण्याकरतां तात्याबा पाटील कोते यांच्याजवळ दिले |
| | ८— २—० | श्री. गणपत केशव कुलकर्णी पाणीवाला. या वर्षाचे रु. ५ दिवस ५, व मागील वर्षांचे चुकीनें राहिलेले ३—२—० मिळून रु. ८—२—० |
| | ४—०—० | श्रीद्वारकाबाई पाणी व धुण्याबद्दल |
| | ३—६—० | कपडेशिलाई |
| | ३—०—० | पोस्त उद्धव, नाना चोपदार व रामू शिंदे प्रत्येकीं रु. १ प्रमाणें |
| | ३९—०—० | कपडेदेणगीदाखल दिले त्यांची किंमत व नांवनिशीः— |
| | | १ अबदुलभाई २ लंगोट २ कफन्या २ फडके व १ दुहेरी धोतर. |
| | | २ नाना चोपदार १ धोतर |
| | | ३ बाळा चोपदार १ ,, |
| | | ४ बयाजी जगताप १ ,, |
| | | ५ रामा न्हावी १ ,, |
| | ६०३—१५—० | |

| जमा | खर्च |
|---|---|
| रु. आ. पै | रु. आ. पै |
| | ६०३-१५-० |

६ तात्या बावके १ ,,
७ गटू शिंदे १ ,,
८ अहिल्या बत्तीवाला १ ,,
९ महेबू तासेवाला १ ,,
१० आण्णा १ ,,
११ म्हाळी १ लुगडे
१२ सीताराम पवार १ धो.जोडा
१३ रामु शिंदा १ धोतर
१४ दस्तगीर १ ,,
१५ भाऊ भगत १ ,,
१६ आण्णाचा बंड्या १ ,,
१७ संत भाऊ कुंभार १ ,,
१८ सखाराम चांभार ६ हात कापड
१९ फकिऱ्या कोळी ५ हात कापड
२० सूरदास ४ हात कापड
२१ निवृत्ति शेळके ४ हात कापड
२२ त्रिंबक तेली ५ हात कापड
२३ श्री.ह.भ.प. विश्रामबुवा } १ उपरणें
*२४ आचाऱ्यास ५ हात फडकें
*२५ नानू पुजारी १२ हात फडकें

६०३-१५-०

जमा

रु. आ. पै

खर्च

रु. आ. पै

६०३-१५-०

*२६ रंगनाथ ४ हात फडके

५- ०-९ किरकोळ

६०- ६-३ श्री. बाबासाहेब तर्खड व श्री. नवलकर सुंदरराव यांनीं केलेला खर्च

८- ०-० कार्यक्रमपत्रिका १०००छापणावळ

१- ८-० कव्हरें १०००

१-१२-० लेपपत्रें (लेबलें) १०००

१८- ०-० निमकर आचारी यास अगाऊ खर्चाकरितां दिले ते

५-१५-० आराधनेकरितां धोत्रें ५

३-१२-० आराधनेकरितां उपरणीं ५

१- ६-९ निशाणासाठीं खादी वार ७

०- ६-० रंगाच्या बढ्या सहा

०-११-० प्रसादाच्या पेढ्यासाठीं द्रव्य

४१-६-९

६६९-६-०

---

* अशीं फुलीं केलेल्या रकमांस स्वयंपाकाच्या व देवाची समाधि, फरशी, कंदील वगैरे पुसण्याकरितां हीं फडकीं दिलीं; देणगी म्हणून नव्हे.

जमा

रु. आ. पै

खर्च

रु. आ. पै

६६९—६—०

४१— ६—९

०— ४—० किलाट कागद (बटर पेपर)

१८— ०—० पेढे १ मण १३ शेर, दर १३॥ रु. मण.

०—१२—० मजुरी-हमाली

२५—८—० आमंत्रणचिठ्या व पावत्या व तिकिटे

०—१५—६ पोस्टाची तिकिटे

१—३—० प्रसादासाठी आणखी पेढे

८८—१—३ यांतून व.

२७—११—०कारण रु.१८हा रकमेचा समावेश आचाऱ्यांना दिलेल्या७१-१४ रकमेंत झाला आहे. तसेच रु. ९—११—० ही रक्कम आराधनाविधि व कीर्तनराज यांना शेले व उपरणी म्हणून स्वतंत्र दुसरीकडे खर्ची पडली आहे.

६३—३—६ श्री.दादा पिलाजी गुरव यांनी खर्च केलेली रकम.

१—१—० प्रसादाच्या पिशव्यांस कागद १० दस्त.

---

७०२—९—६ १—९—०

**खर्च**

| रु. आ. पै | | |
|---|---|---|
| ७०२—९—६ | १—९—० | |
| | २—४—० | शिक्का १०० चीं शिलाई |
| | २९—२—० | पित्रकें पाठविण्यास पोस्ट खर्च |
| | ०—८—६ | रीळ दोऱ्याचें |
| | ३३—३—६ | |
| ०—६—० | | श्रीआसाईतून डांगर व भाजी घेतली तिची किंमत |
| ७०२ १५—६ | | |
| ४००—०—० | श्री. रामचंद्र आत्माराम ऊर्फ बाबासाहेब तर्खड यांजकडून उत्सवकार्यासाठीं खर्चाकरितां घेतलेली आगाऊ रक्कम परत. | |
| ११०२—१५—६ | | |
| ६७—०—६ | शिल्लक: संस्थान-कायम-निधीस देण्याकरितां. | |
| ११७०—०—० | | |

## श्रीपुण्यतिथिउत्सवाचा शके १८५५चा तपशीलवार
## हिशोब व वर्गणीदारांची रक्कमवार यादी

| | | रु. आ. पै. |
|---|---|---|
| अजिंक्य श्री. बेनाबाई | मुंबई | १—४—० |
| अढिया ,, त्रिभुवन नरोत्तम | डहाणू | ५—०—० |
| अंधारी सौ. मिराबाई | कराची | ०—४—३ |
| आचार्य श्री. बाळाराम विश्वंभर | केळवें-माहीम | १—०—० |
| आजरेकर श्री. केशव गणेश | बेळगांव | २०—०—० |
| आजरेकर ,, चि. पंडित | ,, | ५—०—० |
| आजरेकर ,, दत्तात्रय लक्ष्मण | पुणें | १०—०—० |
| आंगणे श्री. गणपत भिवा | कराची | ०—४—३ |
| आंजर्लेकर श्री. काशिनाथ रा. | पुणें | १—०—० |
| उपासनी ,, आनंदराव भास्कर | इंदूर | ५—०—० |
| उपासनी ,, रा. बा. | धुळें | २—०—० |
| आठवले ,, रघुनाथ बापूजी | शिरडी | २—०—० |
| आगरवाले शेट तेजपाल गिरधरलाल | चोपडें | ५—०—० |
| आरोळकर श्री. आत्माराम लाडोबा | गुंतकल | ५—०—० |
| कडेकर सौ. पार्वतीबाई | कराची | ०—८—३ |
| कदम श्री. शंकर सीताराम | ,, | ०—४—३ |
| करमरकर सौ. सीताबाई | ,, | ०—८—० |
| करंडे श्री. भास्कर विष्णु | मुंबई | ३—०—० |
| करंदीकर श्री. हरि कृष्ण | इटारसी | १—०—० |
| कराळे सौ. रुक्मिणीबाई | कराची | ०—४—० |
| कर्णिक श्री. त्रिंबक आ. | कल्याण | ५—०—० |
| | | ७३—५—० |

| | | |
|---|---|---|
| | | रु. आ. पै. |
| | | ७३--५--० |
| कर्णिक ,, गजानन त्रिंबक | ,, | ५--०--० |
| कानिटकर श्री. काशीबाई | नगर | ३--०--० |
| कारखाननीस श्री. गणेश शिवराम | वांद्रें | ०--४--० |
| कानिटकर ,, बा. गो. | नरग | ३--०--० |
| कीर्तने श्री. मधुकर दा. | इंदूर | १०--०--० |
| कांबळी ,, मधुसूदन धोंडुजी | चोपडें | १-१०-० |
| कुडाळकर श्री. सदानंद भास्कर | वांद्रें | २--४--० |
| कुरतुडकर ,, रामचंद्र श्रीपाद | दादर | २--०--० |
| कुळकर्णी ,, दत्तात्रय महादेव | मालाड | १--०--० |
| केळकर श्री. भिकाजी नारायण | दादर | १--४--० |
| केसरकर ,, वामन सांबासेट | वांद्रें | ५--०--० |
| कैकिणी डॉ. श्रीपाद शांतमूर्त | मियागांव | १-१४-९ |
| कोठारी श्री. जीवनराम बाळकृष्ण | इंदूर | १०--०--० |
| कोठारे सौ. चंपूबाई गणपतराव | मुंबई | १--४--० |
| कोठारे श्री. गणपतराव मोरेश्वर | ,, | १--०--० |
| कोठारे श्री. यमुनाबाई गजानन | सान्ताक्रुझ | १--४--० |
| कोप्पीकर श्री. पांडुरंग टी. | धारवाड | ६--०--० |
| कोरान्ने श्री. माधव गंगाधर | बिलिमोरा | १--४--० |
| क्लार्क डॉ. एच्. आर्. | खंभात | ५--०--० |
| कमेसरिएटवाला बाई जेरबाई एन्. | दादर | १--४--० |
| करंजेकर श्री. कमलाबाई | पुणें | १--०--० |
| करंजेकर ,, बगूबाई | पुणें | १--०--० |
| करंदीकर श्री. रामकृष्ण जनार्दन | डहाणू | ५--०--० |
| | | १४३--५--९ |

| | | रु. आ. पै. |
|---|---|---|
| | | १४३--५--९ |
| कवठेकर ,, बाबू सीताराम | पुणे | १--०--० |
| कांबळी ,, मदुसूदन धोंडजी | मुंबई | १--४--० |
| काळे श्री. जे. एम्. | माहीम | २--०--० |
| किराणे ,, महादेव पुरुषोत्तम | सातारा | ५--०--० |
| कीनिकर,, प्रेमला ग. | खार | १--४--० |
| कुलकर्णी श्री. काशीनाथ पांडुरंग | ठाणें | ५--०--० |
| कोजलगी श्री. सुभद्राबाई | हैद्राबाद (निजाम) | १--४--० |
| खरणेकर श्री. पांडुरंग विठ्ठल | कुर्ले | १--४--० |
| खारकर ,, श्रीधर नारायण | ठाणें | १--०--० |
| खाडिल्कर,, नरहर पुरुषोत्तम | सोलापूर | १--०--० |
| श्री. गणपत शंकरशेट | जामटी | १--४--० |
| गव्हाणकर डॉ. आर. एन. | बसई | १०--०--० |
| गावडे सौ. मुक्ताबाई | कराची | ०--५--३ |
| गाळवणकर श्री. यशवंत जनार्दन | वांद्रे | २--०--० |
| गिरधर ,, दामोदर विनायक | अंधेरी | २--०--० |
| गिरधर ,, विनायक शंकर | ,, | २--०--० |
| गिरधर ,, रघुनाथ त्रिंबक | ,, | २--०--० |
| गोध डॉ. विनायकराव जगन्नाथ | वांद्रे | १--०--० |
| गुरुजी सौ. रखमाबाई | कराची | १--४--० |
| गाडबोले श्री. हरि त्रिंबक | कल्याण | १--४--० |
| गाडगीळ लक्ष्मीबाई ऊर्फ वहिनीसाहेब | पुणें | ५--०--० |
| गुप्ते श्री. शांताराम विठ्ठल | कल्याण | २--०--० |
| गोखले,, लक्ष्मण रघुनाथ उर्फ तात्यासाहेब | पुणें | ५--०--० |
| | | १०८--७--० |

| | | रु. आ. पै. |
|---|---|---|
| | | २०८—७—० |
| घटे श्री. जनाबाई सीताराम | सोलापूर | ५—०—० |
| चव्हाण श्री. बी. के. | पालघर | ४—०—० |
| चव्हाण श्री. रखमाबाबाई | कराची | ०—१०—३ |
| चांदोरकर श्री वा. ना. | कल्याण | १—०—० |
| चितळे सौ. गंगाबाई | कराची | ०—४—३ |
| चुरी. श्री. मोरेश्वर हरि | बोर्डी | १—४—० |
| चोणकर कु. विजया आर. | बोरीवली | २—८—० |
| चौबळ श्री. केशव वामन | ठाणे | २—०—० |
| चौबळ श्री. महादेव विष्णु | ,, | १—०—० |
| जयकर सौ. कमलाबाई शूरसेन | पार्ले | १—४—० |
| जयकर श्री. सोनाबाई | बांद्रे | २—०—० |
| जाधव श्री. महादेव बापुजी | कल्याण | १—४—० |
| जांभळे ,, गोपाळ प्रल्हाद | सातारा | १—०—० |
| जुन्नरकर ,, यशवंत राजाराम | धरमपूर | ४—०—० |
| जोशी ,, मोरेश्वर वि. | डेबरगांव | १—०—० |
| टेमकर सौ. लक्ष्मीबाई | कराची | १—४—० |
| डोळस श्री. आनंदराव परशराम | कांदीवली | २—०—० |
| तन्ना ,, गोवर्धन गिरधर | डहाणू | ५—०—० |
| तळपदे ,, आनंदराव गणपतराव | बांद्रे | १—४—० |
| ,, श्री. द्वारकाबाई वि. | मुंबई | १—०—० |
| तळवळकर डॉ. बा. रा. | इंदूर | ५—०—० |
| तात्रे एस. एम. | जळगांव | १०—०—० |
| ताम्हणकर श्री. पी. एम. | तालीकोट | २—०—० |
| | | २५४—१—६ |

| | | |
|---|---|---|
| | | रु. आ. पै |
| | | २५४-१-६ |
| तालचरकर सौ. कृष्णाबाई विनायकराव | इंदूर | ५-०-० |
| तावडे श्री. त्रिंबकराव नारायण | मुंबई | १-०-० |
| तेंडुलकर कु. इंदिराबाई | कराची | ०-५-३ |
| ,, सौ. रुक्मिणीबाई | ,, | १-४-० |
| ,, डॉ. शामसुंदर शंकर | पुणें | १-४-० |
| तना रावसाहेब शेट नरोत्तम गिरधर | डहाणू | २-०-० |
| तार्डवाला श्री. दोराबजी धनजीभाई | मुंबई | २-४-० |
| त्रिवेदी डॉ. लक्ष्मीप्रसाद | मेमदाबाद | ५-०-० |
| तेंडले श्री. लाडू नारायण | पोस्ट बांद्रें | १-४-० |
| तोडणकर सीताराम विश्राम | दादर | ६-०-० |
| तर्खड श्री. रामचंद्र आत्माराम | खार | ७-४-६ |
| ,, सौ. उषादेवी सत्येंद्र | ,, | १-४-० |
| ,, डॉ. सत्येंद्र रामचंद्र | ,, | १-४-० |
| ,, सौ. लक्ष्मीदेवी ज्योतींद्र | ,, | १-४-० |
| ,, श्री. ज्योतींद्र रामचंद्र | ,, | १-४-० |
| ,, ,, देवेंद्र रामचंद्र | ,, | १-४-० |
| थोरात ,, विठ्ठल नारायण | इचलकरंजी | ३-०-० |
| दळवी श्री. ज. ना. | वसई | ३-०-० |
| दळवी ,, हरिभाऊ बाळकृष्ण केळवे | माहीम | १-०-० |
| ,, ,, ,, ,, कै. राधाबाईंवतीनें | ,, | १-४-० |
| दहीसकर श्री. मोरेश्वर आत्माराम | शहापूर | २-८-० |
| दाभोळकर ,, गजानन गोविंदराव | बांद्रें | १-०-० |
| दिघे ,, श्रीकृष्ण गोपीनाथ | मुंबई | ५-०-० |
| | | ३०९-११-३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | रु. आ. पै. |
| | | | २००-११-३ |
| दुर्वे | ,, डी. एम. | कल्याण | २--०--० |
| देव | ,, रामचंद्र सीताराम | अंधेरी | २--०--० |
| देव | ,, सदाशिव विश्वनाथ | पौड | १--०--० |
| देवधर | ,, व्ही. ए. | बडोदें | ५--०--० |
| देशपांडे | सौ. इंदुमती | दादर | २--०--० |
| देशपांडे | श्री. नारायण रामचंद्र | बदलापूर | १--४--० |
| देशमुख | ,, गोविन्द हरि | शिरोशी | २--८--० |
| देशमुख | ,, द्वारकानाथ हरि | ,, | ५--०--० |
| देसाई | श्री. सौ. कमळाबाई | कराची | १--४--० |
| देसाई | ,, जनार्दन आत्माराम | मुंबई | १--०--० |
| देसाई | श्री. वासुदेव पुतळाजी | ठाणें | १--०--० |
| दातार | ,, गोपाळ भास्कर | ,, | १--०--० |
| दातार | ,, विष्णु हरि | ,, | ०--२--० |
| दिवेचा | श्री. सुमती | खार | १--४--० |
| देव | श्री. विष्णु गोविंद | दौंड | ११--०--० |
| धराधर | श्री. चंपूबाई आनंदराव | मुंबई | १--४--० |
| धवळीकर | श्री. शंकर मोरेश्वर | पुणें | ५--०--० |
| धुरंधर | बाबुलजी कृष्णनाथ | सांताक्रूस | १--०--० |
| नवलकर | कु. बाबली बाई | मुंबई | १--४--० |
| नवलकर | श्री. सुंदरराव दिनानाथ | ,, | १--४--० |
| नवलकर | सौ. शांताबाई सुंदरराव | ,, | १--४--० |
| नाईक | सौ. यशोदाबाई नारायण | सफाळा | १--०--० |
| नाचणे | श्री. शांताराम बळवंत | कुर्ले | २--४--० |
| | | | २६१--५--३ |

| | | रु. आ. पै. |
|---|---|---|
| | | २६१--५--३ |
| नाडकर्णी सौ. अनुसूया | | २--०--० |
| नानल कु. दिगंबर | कराची | ०--४--० |
| नायक श्री. बाळाराम केरोबा | मुंबई | १--४--० |
| नवलकर श्री. रामकृष्ण | ,, | ५--०--० |
| नार्वेकर श्री. श्रीमतीबाई | ,, | ५--०--० |
| परदेशी श्री. डी. बी | पुणें | १--४--० |
| पवार श्री. केशव लक्ष्मण | कराची | ०--४--३ |
| पवार सौ. निराबाई | ,, | १--०--० |
| पंडित श्री. रामनारायण भिकाजी | खंडवा | १--०--० |
| पाटकर ,, दत्तात्रय विठ्ठल | कल्याण | ५--०--० |
| पाटकर ,, विठ्ठल मोरेश्वर | पनवेल | २--०--० |
| पाटकर सौ. सुंदराबाई | बडोदें | ५--०--० |
| पाटणकर ,, दत्तात्रय नारायण | बांद्रे | १--४--० |
| पाटील ,, आनंदराव दाजी | मढद | १--४--० |
| पाटील सौ. काशीबाई | कराची | १--४--० |
| पितळे श्री. दत्ताराम आनंदराव | मुंबई | १--४--० |
| पोतदार ,, घनश्याम शिवराम | ,, | १--०--० |
| प्रधान ,, के. वाय | पंचमहाल | २--०--० |
| प्रधान ,, शंकर ए. | कल्याण | १--०--० |
| प्रधान श्री. शंकर अनंत | डोंबिवली | ५--०--० |
| प्रभु ,, गोविंद सीताराम | कर्जत | १--४--० |
| पटेल ,, माणिभाई मुळाभाई | मेमदाबाद | १--४--० |
| परदेशी ,, शिवचरण रामानंद | बांद्रे | १--०--० |
| | | ४०७-१३-६ |

| | | |
|---|---|---|
| | | रु. आ. पै. |
| | | ४०७-१३-६ |
| पाटणकर,, सीताबाई | नाशिक | १--४--० |
| पंडित केशव महादेव | (केळवे) माहीम | १--४--० |
| फणसे ,, एन. जी. | कल्याण | १--०--० |
| फाटक श्री. आजीबाई | कराची | १--४--० |
| बावचकर श्री. कृष्णाजी लक्ष्मण | सोलापूर | १--०--० |
| बांदेकर ,, केशव बापुशेट, बांदे | बांदे | २--०--० |
| बिराजदार चनबसप्पा सातलिंगप्पा | सोलापूर | २--०--० |
| बिल्ये श्री. शंकर बाळाजी | ठाणे | १-१०-० |
| बेंद्रे ,, के. प. | कर्जत | २--०--० |
| ब्रम्हांडकर कु. शांताबाई | मुंबई | २--०--० |
| बोडस कु. नारायण लक्ष्मण | कराची | १--४--० |
| बोरकर सौ. चंद्राबाई | पार्ले | १०--०--० |
| भागवत श्री. पांडुरंग लक्ष्मण | भुसावळ | २--०--० |
| भंडारे सौ. गंगूबाई श्रीधर | सोलापूर | १--४--० |
| भांडारे श्री. श्रीधर गणेश | ,, | २--०--० |
| भावे ,, विनायक दाजी | पुणे | १--०--० |
| भट डॉ. छोटालाल मुळाभाई | अमदाबाद | २०--०--० |
| भिडे श्री. गोपाळ रघुनाथ | फलटण | ५--०--० |
| भोलागीर आनंदगीर गणपतगीर | पुणे | ५--०--० |
| मराठे श्री. भास्कर चिंतामण | | १--०--० |
| महाजन ,, महादेव जिवाजी | मुंबई | ०--४--० |
| महाडिक ,, रामचंद्र पांडुरंग | कराची | ०--४--३ |
| मेंद्रा श्री, राजूबाई | ,, | १--४--० |
| | | ४७३--७--९ |

| | | | रु. आ. पै. |
|---|---|---|---|
| | | | ४७३–७–९ |
| मंत्री | श्री. लक्ष्मीबाई दौलतराव | मुंबई | ५–०–० |
| ,, | श्री. पांडुरंग जयराम | ,, | ४–०–० |
| मानकर | ,, बाळकृष्ण माधवराव | बांद्रे | २–०–० |
| मानकर | श्री. वामन केशवराव | खडकी | ५–०–० |
| मालवणकर | कु. कमलाबाई बाळकृष्ण | कराची | १–४–० |
| ,, | श्री. गजानन ,, | ,, | २–०–० |
| ,, | ,, चंद्रकांत ,, | ,, | ५–०–० |
| मिशाळशेट | ,, सोयरोबा महादेव | बांद्रे | ०–८–० |
| मुदलियार | सरदार एस. सी. | पुणें | २–०–० |
| मुरकुटे | श्री. छगनलाल कृष्णराव | मुंबई | १–०–० |
| मुळे | ,, गोविंद अमृतराव | माहीम | १–४–० |
| मेहेंदळे | ,, कृष्णाजी नारायण | केळवें माहीम | १–०–० |
| मेस्त्री | ,, हरिश्चंद्र रामजी | अंधेरी | १–०–० |
| मोडक | ,, गोविंद विनायक | कल्याण | २–८–० |
| ,, | ,, रामचंद्र वामन | पुणें | १–४–० |
| मोरे | ,, रामा | कराची | ०–४–३ |
| ,, | ,, धाकू गुणाजी | ,, | ०–५–३ |
| मळेकर | ,, हरिभाऊ भिसाजी | मुंबई | १–४–० |
| मंत्री | ,, वासुदेव केशव ऊर्फ आप्पासाहेब | सातारा | ५–०–० |
| रत्नपारखी | ,, धोंडो मनोहर | जानिगिर | ५–०–० |
| राजवाडे | सौ. लक्ष्मीबाई | कराची | १–४–० |
| राजाध्यक्ष | श्री. पुरुषोत्तम आत्माराम | मुंबई | १–८–० |
| राजे | ,, द्वा. ना. | लोणावळें | ५–०–० |
| राजे | श्रीयुक्ता शांताबाई | कल्याण | १–०–० |
| | | | ५२८–१३–३ |

| | | |
|---|---|---|
| | | रु. आ. पै. |
| | | ५२८-१३-३ |
| राणे डॉ. जी. के. | मुंबई | ५--०--० |
| रामजी श्री. जीवा नारायण | मुंबई | ५--०--० |
| रासने ,, दामोदर सांवळाराम | नगर | ५--०--० |
| राळे ,, वि. ना. | ,, | १०--०--० |
| रेडी श्रीसाईप्रसाद लक्ष्मणराव | बडोदें | १०--०--० |
| रेघे श्री. आर. डी. | कुडाळ | ३--०--० |
| राणे ,, दत्तात्रय राजाराम | मुंबई | २--८--० |
| राणे ,, विजयकुमार ग. | खार | ०--४--० |
| रेगे ,, गंगाराम भिकाजी | ठाणें | १--४--० |
| लागू श्री. बहिनीबाई | कराची | ०--४--३ |
| वखारकर श्री. खंडेराव दिनानाथ | मुंबई | १--०--० |
| वगळ ,, रामकृष्ण नाना | ,, | २--०--० |
| वराडकर सौ. इन्दिराबाई | कराची | ०--८--० |
| ,, ,, सखूबाई | ,, | ०--५--३ |
| वर्दम श्री. गबा आबा शेट | सावंतवाडी | ५--४--० |
| वणीकर ,, शंकर यादवराव | व्यारा | २--८--० |
| वाक्कर ,, जयराम पांडुरंग | कराची | १--४--० |
| ,, सौ. वत्सलाबाई जयराम | ,, | ५--८--० |
| बाटवे श्री. र. ह. | अहमदाबाद | ५--०--० |
| विजयकर ,, गंगाबाइ माधवराव | मुंबई | १--०--० |
| ,, ,, गोवर्धन माधवराव | ,, | १--०--० |
| ,, ,, खंडेराव माधवराव | ,, | ३--०--० |
| | | ५९९--६--९ |

| | | रु. आ. पै. |
|---|---|---|
| | | ५९९--६--९ |
| वैद्य ,, बाळकृष्ण वामन | बांद्रें | २--०--० |
| ,, ,, भाऊ आबाजी | पालघर | ५--०--० |
| ,, श्रीयुक्ता मनोरमाबाई | कल्याण | १--०--० |
| ,, ,, विनायक आप्पाजी | अंधेरी | २--०--० |
| व्यवहारकर श्री. आनंदराव वा. | मुंबई | १--४--० |
| वाड श्री. गोविंद विनायक | भुसावळ | ११--०--० |
| शिरसाठ ,, आत्माराम बाळकृष्ण | बांद्रें | २--०--० |
| शिरोडकर,, सावळाराम आत्माराम | कुर्ले | १--८--० |
| शिरोडकर सौ. राधाबाई सावळाराम | ,, | १--४--० |
| शिंदे श्री. शंकरराव | कराची | १--४--० |
| शुक्ल जीवनराम के. | उंबरगांव | २--०--० |
| श्रीराममारुती संस्थान | कल्याण | ५--०--० |
| सकपाळ श्री. हरि गोपाळ | बांद्रें | १--४--० |
| सबनीस ,, दत्तात्रय मोरेश्वर | पार्ले | ५--०--० |
| श्री. सरस्वतीबाई गणपतराव | मुंबई | १--०--० |
| सवार श्री. नारायण पुंडलिक | बांद्रें | ०--८--० |
| " साईबाबा " C/o मो. वि. प्रधान | सांताक्रूझ | ०--५--० |
| साईनाथ आणि कंपनी | पुणें | २--८--० |
| साखळकर श्री. भालचंद्र वि. | नावळगांव | १--४--० |
| साठे सौ. गंगूबाई | कराची | ०--५--३ |
| सानवरे कु. सिंधुबाला चिंतामण | बांद्रें | १--४--० |
| सावंत श्री. शांताराम धोंडू | ठाणें | ५--०--० |
| सावे ,, मोरेश्वर नारायण | मुंबई | ३--०--० |
| सावे डॉ. केशरीनाथ वासुदेव | ,, | १०--०--० |
| | | ६६६--१-- |

| | | रु. आ. पै |
|---|---|---|
| | | ६६६–१–० |
| सुर्वे सौ. श्रीमंतसाहेब इन्दिराबाई | सावंतवाडी | ५–०–० |
| सोनार श्री. महादेव गोविंद | पनवेल | १–४–० |
| सोनटक्के श्री. लक्ष्मण बाळकृष्ण | ठाकुरद्वार | १–४–० |
| सांत्रारे ,, दाजी विठ्ठल | पार्ले | ५–०–० |
| सामंत श्री. रामभाऊ आर. | बांद्रे | १–०–० |
| सावंत ,, नागेश आत्माराम | मुंबई | ५–०–० |
| झेजीव श्री. सीताबाई | कराची | ०–८–३ |
| | | ६८५–१–३ |

# श्रीसाईबाबा

## सप्टेंबर महिन्याचें शिर्डीवृत्त

सप्टेंबर महिन्यांत शिर्डी येथें श्रीसाईदर्शनाकरितां मुंबई, पुणें, अहमदनगर, हरदा, अहमदाबाद,ठाणे,भुसावळ, सांताक्रुझ, विलेपार्ले,पंढरपूर, थोढांगी ( जि. कुलाबा ), मद्रू, नाशिक, कुर्ला, बांद्रे, आळंदी, पारनेर, बडा सराफा ( इंदुर ), कोपरगांव वगैरे ठिकांणाहून भक्तमंडळी आली होती व बरेंच भक्तमंडळ नेहमींप्रमाणें पुण्यतिथिउत्सवास हजर होतें. पुण्यतिथीच्या उत्सवाकरितां श्री. वा. वि. देव ऊर्फ बाळासाहेब देव, श्रीयुत र. भा. पुरंदरेसह व्यवस्था वगैरे करण्याकरितां आधीं पांच दिवस शिर्डीस गेले होते. उत्सव चांगला पार पडला. अलीकडे उत्सवांत भक्त व पाहुणेमंडळीस राहण्याच्या जागेची अडचण पडूं लागली आहे; त्यामुळें मुलेंबाळें घेऊन येणाऱ्या भक्तांची फार गैरसोय होते. मागें श्रीरामनवमी-उत्सवाच्या वेळीं अशीच गैरसोय झाली होती. त्यामुळें कांहीं भक्तजन श्रीसाईसमाधीचें दर्शन घेऊन आल्यापावलीं परत जाण्यास निघाले होते. ह्या जागेच्या अडचणींमुळें पुष्कळ भक्तजन मुलांबाळांसह येण्याचें करीत नाहींत. पो. स. इ. श्रीयुत ना. आ. सावंत हे संस्थानच्या खुल्या जागेवर, लहान दोन दोन खोल्यांची घरें बांधण्याच्या योजनेच्या एका दोन खोल्या घरास बांधण्यास येणाऱ्या खर्चाची रकम खर्च करण्यास तयार आहेत. त्याचप्रमाणें मुंबई येथील डॉ. केशरीनाथ वासुदेव साबे हे रु. १००० पर्यंत खर्च करण्यास तयार आहेत. त्यांचें पत्र आजच्या अंकांत दुसरीकडे त्यांच्या विनंतीवरून प्रसिद्ध केलें आहे. त्यावरून मंडळीस जागेची अडचण किती पडते, हें दिसून येईल.

श्रीयुत शिरवळकर गवई, श्री. गणेश गोपाळ देशपांडे यांचीं ता. २८ व २९ सप्टेंबर रोजीं कीर्तनें झालीं. त्याचप्रमाणें तांदुळवाडीचे ह. भ. प. विश्रामबुवा यांचीं ता. २९ व ३० रोजीं कीर्तनें झालीं. पुण्यतिथीचें कीर्तन साईआख्यान हें नेहमींप्रमाणें श्री. बाळासाहेब देव यांनीं प्रेमानें केलें. पुण्यतिथीच्या उत्सवाचा अहवाल वगैरे श्री. बाळासाहेब देव सादर करणार आहेत, म्हणून त्याबद्दल जास्त कांहीं लिहिलें नाहीं. शिर्डी संस्थानकमिटीची सभा शिर्डी

येथें रावबहादुर मोरेश्वर वि. प्रधान यांच्या अध्यक्षतेखालीं ता. २९ सप्टेंबर रोजीं भरली होती.

श्रीयुत आर. वी. आठवले यानीं श्रींस अभिषेक करून सव्वा मणाचा भात, आमटी व भाजीचें जेवण केलें.

श्री. बाळासाहेब देव यांनीं श्रीसाईबाबा-पुण्यतिथींच्या दिवशीं व इतर प्रसंगीं कीर्तनांत श्रीसाईबाबा-आख्यान लावण्याकरितां तयार केलेलें श्रीसाईबाबा-आख्यान आतां छापून तयार आहे. त्याची किंमत दोन आणे आहे.

## जिन्नसा, देणगी वगैरे आल्या त्यांचा तपशील.

१. श्रीयुत दादाजी गोपिनाथ जोशी—दादर मुंबई.

१ चांदीची सांगली घाटाची लोटी, वजन २३॥ तोळे किं. रु. १६; उत्सवाच्या तीन दिवसांत शोभेचें दारूकाम केलें.

२. श्री. रतनबाई पार्शी. पांढऱ्या मलमलीच्या कापडाची मच्छरदाणी.

३. श्री. दुर्गाबाई देशवंडीकर, जळगांव-१ रेशमी गलेफ.

४. श्रीयुत नागेश आत्माराम सावंत, पो. स. ई. मुंबई. २

१ पिवळ्या रंगाचा जरीकाठी कद.

५. श्रीयुत विष्णु गोविंद देव, रेंज फॉरेस्ट ऑफिसर दौंड.

१ केसरी रंगाची शालजोडी; उजवा शंख चांदीच्या टोपणासह.

६. श्रीयुत गोपाळ हरि तळवळकर, इरिगेशन ओव्हरसीयर, शिर्डी.

१ साधें उपरणें.

७. श्रीयुत बाळासाहेब चौबळ यांच्या सुनेकडून हस्तें, श्री. सीताराम पवार, पुणें, सोमवार पेठ.

१ श्रीसाईसमाधीवरील श्रीसाईच्या तसबिरीस घालण्याकरितां चांदीचा गोफ वजन १३॥ तोळे ३ मासे व त्यांत सोन्याची पुतळी व त्यावर श्रीगणपतीचा ठसा.

८. श्रीयुत रामकृष्ण श्रीकृष्ण नवलकर.

१ निळ्या रंगाचा जरीकाठी कद.

साईभुवन,
१४१ प्रिन्सेस स्ट्रीट,
मुंबई, ता. २७ आक्टोबर १९३३

**सुं. दि. नवलकर,**
ऑ. चिटणीस.

श्री सा ई बा बा

## आक्टोबर महिन्याचें शिर्डीवृत्त

आक्टोबर महिन्यांत जुन्नर, पुणें, नाशिक, सुरगाणा संस्थान, ठाणे, मुंबई, आंजर्ले येथून भक्तमंडळी दर्शनाकरितां आली होती. श्रीमंत सरकार राजेसाहेब सुरगाणा संस्थान हे त्यांचे दिवाणसाहेब व संस्थानचे विश्वस्त रावबहादूर स. ब. धुमाळ यांच्याबरोबर मंडळीसह दर्शनाकरितां आले होते.

नांदुळवाडीचे ह. भ. प. विश्रामबुवा यांचीं कीर्तनें ता. २।३ व ४ रोजीं झालीं. कीर्तनास आसपासच्या खेड्यांतील बरीच मंडळी येत असे.

ता. २ रोजीं श्रीयुत बापाजी यांनीं दोनप्रहरीं समधीपुढें कीर्तन केलें.

आंजर्ले येथील पेन्शनर डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर श्री. दामोदर बाळकृष्ण वाटट यांनीं ता. २६ रोजीं समाधीपुढें कीर्तन केलें.

श्रीद्वारकामाईमध्यें दिपवाळीनिमित्त का. शु० १ बलिप्रतिपदेस दीपोत्सव केला होता व श्री. शिरवळकर गवई यांचें कीर्तन झालें. कार्तिक शु० ११ पालखीची मिरवणूक काढली होती व रात्रीस श्री. बापाजी कुळकर्णी यांचें कीर्तन झालें. नंतर श्री आठवले, इरिगेशन ओव्हरसियर यांनीं सर्वांस चहापान दिलें.

श्री. बाळकृष्ण वि. देव, संस्थानचे एक विश्वस्त यांनीं पुण्यतिथीचा उत्सवाचा कार्यक्रम आटोपून संस्थानच्या भांड्यांची नंबरवारी नोंद करून व इतर संस्थानचीं कामें करून ता. २४ ला शिर्डी सोडली. ते शिर्डीत असतांना ज्ञानेश्वरीवर पुराण सांगत असत. ते ज्ञानेश्वरी सर्वांस समजेल अशा रीतीनें सांगतात व श्रोतृवर्गामध्यें त्या विषयाची आवड उत्पन्न करितात.

साईभुवन,<br>
१४१ प्रिन्सेस स्ट्रीट,<br>
मुंबई ता. ५।११।३३

**सुं. दि. नवलकर**<br>
ऑ. चिटणीस

२

३६ बनाम हॉल लेन, गिरगांव,

मुंबई ६-१०-३३

श्रीयुत सुंदरराव दिनानाथ नवलकर, सेक्रेटरी, शिर्डी संस्थान कमिटी यांस, सप्रेम विनंति विशेष. मागील श्रीसाईलीलेच्या १-२ अंकांत श्रीक्षेत्र शिर्डी येथें उत्सवाच्या दिवसांत पाहुणेमंडळींची राहण्याची व्यवस्था ठीक लागत नाहीं, गैरसोय होऊन जागा अपुरी पडते, असा मजकूर लिहिला गेला होता। संस्थेची रिकामी जागा पडीत असल्यामुळें त्यावर दोन खोल्यांचा एक ब्लॉक अशा रीतीनें कांहीं ब्लॉक्स बांधले तर वर दर्शविलेली गैरसोय नाहींशी होईल अशी सूचना केली होती.

मी आपणांस कळविल्याप्रमाणें पुण्यतिथीच्या उत्सवास शिर्डीस जाणार होतों व समक्ष बाबासाहेबांबरोबर त्यासंबंधीं बोलणार होतों. पण आयत्या वेळीं प्रकृति नादुरुस्त झाल्यामुळें जाण्याचा योग आला नाहीं. जर आपण संस्थेच्या असलेल्या जागेवर १ खोली पुढेंपाठीं ( अर्थात् डबल रूम ) अशा २ खोल्यांचा ब्लॉक रु. १००० ( एक हजार ) पर्यंत बांधण्याचें मनावर घेत असल्यास मी तो खर्च सोसण्यास तयार आहें. विशेष खुलाशास समक्ष भेटीची जरूर असल्यास Telephone No. 21662 नें किंवा समक्ष घरीं दुपारीं १-५ दरम्यान आपण विचार करूं. आपण योग्य तो विचार करून काय तें ठरवा म्हणजे झालें. कळावें, लोभ असावा हे विनंति.

आपला स्नेहांकित

**केशरीनाथ वासुदेव सावे**

वि. वि. आपण ही सूचना पुढील श्रीसाईलीलेच्या अंकांत प्रसिद्ध करून आणखी कांहीं साईभक्तांच्या मनांत अशी प्रेरणा झाल्यास याहीपेक्षां मोठा ब्लॉक उभारतां येईल, असें मला वाटतें.

**के. वा. सा.**

# अनुभव

बोर्डी ता. ११-१२-३३.

साष्टांग नमस्कार वि. वि. मजला माहे कार्तिक महिन्याचा मासिक अंक मिळाला नाहीं; तरी मिळण्यास विनंती करितों. चुकून दुसरीकडे गेला किंवा कसें समजत नाहीं; तरी आतां अंक बोर्डी पत्त्यावर मिळण्यास विनंती करितों. सदरहू अंक मजला न मिळाल्यामुळें माझा ओढा शिरडीस धांव घेत होता. परंतु विचित्र लीला अगाध आहे. कारण मीं कल्याणपर्यंत जाऊन तेथून परत बोर्डी येथें येणें हें नवल आहे. कळावें हे विनंती.

आपला,

**मोरेश्वर हरिश्चंद्र चुरी**

## उत्तर

॥ श्रीसाईमाउली प्रसन्न ॥

आपलें कृपायुक्त पो. का. आज हातीं आलें. श्रीसाईमाउलीची लीला अगाध आहे. श्रीशिरडीस जाण्यायेण्याचा खर्च व त्रास चुकावा या निमित्तानेंच आपणांस कल्याणहून खेंचून परत बोर्डीस जाण्यास लावलें. कांहीं कारणामुळें श्रीलीलेचा कार्तिक महिन्याचा अंक प्रसिद्ध होण्यास विलंब झाला आहे. श्रीकार्तिक व मार्गशीर्ष या महिन्यांचा जोड अंक प्रेसमध्यें छपत आहे. पुढील आठवड्यांत तो आपणास बोर्डीच्या पत्त्यावर जरूर मिळेल. चिंता करूं नये. आपला वरील अनुभव श्रीलीलेंत प्रसिद्ध व्हावा असें वाटतें. कळावें लोभ असावा हे विनंती.

आपला,

५१ इ, पाला रोड, खार
१३-१२-३३.

रा. आ. तर्खड,
संपादक—श्रीसाईलीला

वरील अनुभवावरून विचार सुचले ते असे. कांहीं विद्वान् गृहस्थांना वरीलसारखे अनुभव क्षुल्लक वाटतात. परंतु अशा क्षुल्लक दिसणाऱ्या अनुभवांमध्यें गांभीर्य, व श्रीसाईमाउलीचें आपणावर विश्वास ठेवणाऱ्यांवर अलौकिक प्रेम, याचा विचार व्हावयास पाहिजे. हें प्रेम दृग्गोचर झाल्यावर त्या मनुष्याची श्रींच्या, श्रीपरमेश्वराच्या, ठायीं निष्ठा दृढमूल होते. हें विसरतां कामा नये. या-

विषयींची लेखकाच्या अनुभवांतील एक गोष्ट खालीं दृष्टांत देत आहे.

श्रींचे अनुभव लेखकाला मुळींच क्षुल्लक वाटत नाहीं. श्रीसाईरूपी परमेश्वर आपल्या बाल-गोपाळांस अनेक तऱ्हेनें, अनेक प्रकारच्या अनुभवांनीं आपलें अस्तित्व व प्रेम जाहीर करून धीर देत असतो. म्हणून असे अनुभव जसेच्या तसे त्या त्या भक्तांच्या लेखणींतून लिहून आलेले प्रसिद्ध करण्यांत लेखक आपलें आद्यकर्तव्य समजत आला आहे. त्याविषयीं संशय घेणें अथवा तुच्छतेनें पाहणें हें श्रीसाईचरणीं द्रोह करणें असें तो समजत आहे. गेल्या पुण्यतिथीच्या वेळीं घडलेली गोष्ट.

एक नामांकित गृहस्थ, ज्यांनीं श्रीसाईबाबांना देहधारिन् असतां पाहिलें नव्हतें, तरी त्यांची श्रीचरणीं निष्ठा बसली. ते मुळींच अंध श्रद्ध नाहींत ते युरोपचा प्रवास सहकुटुंब करून आले आहेत. मनानें व वर्तनानें अत्यंत सच्छील, व प्रेमळ. त्यांचें कुटुंबही या बाबतींत किंबहुना त्यांच्यापेक्षांही सुशील. ते एके दिवशीं म्हणाले,

"बाबासाहेब ! आजपर्यंत मी श्रीसाईलीलेंत आलेले अनुभव क्षुल्लक समजत होतों. आपण असे अनुभव प्रसिद्ध करणें हें श्रीलीलेसारख्या भारदस्त मासिकास गौण असें माझें मत होतें; परंतु आज मजवरच असा प्रकार घडला कीं, त्यामुळें असे अनुभव गौण असें मीं कधींही समजणार नाहीं. शौचास गेल्यावर बद्धकोष्टामुळें अगदीं बेजार झालों. बाबांचा धांवा केला. आणि जेव्हां पुष्कळ वेळानें व कष्टानें पोट साफ झालें तेव्हां बरें वाटलें. मजवरच हा प्रसंग घडल्यामुळें श्रीलीलेंत प्रसिद्ध झालेला व होणारे अनुभव क्षुल्लक असें मी कधींही मनात्याचा नाहीं." ही हकीकत त्यांनीं मोठ्या प्रेमानें चारचौघां सद्गृहस्थां-पुढें सांगितली. त्या वेळीं त्यांच्या तोंडावर श्रीचरणींचें प्रेम उघड दिसत होतें

कांहीं वाचकांस त्यांच्या मनोवृत्तीमुळें वरील गोष्ट अश्लील किंबहुना बीभत्सही वाटेल. परंतु शारीरिक व्याधींमुळें, प्रसूतिवेदनांसारख्या प्रसंगीं जेव्हां प्राण व्याकुळ होऊन श्रीचरणांचा धांवा प्राणी करीत असतो, त्यालाच हा प्रसंग अश्लील व बीभत्स वाटणार नाहीं.

दादर १४-१२-३३ संपादक

## श्रीदत्तचित्साईसद्गुरुभ्योनम:

श्रीयुत श्रीसाईलीला संपादक महाशय यांस सप्रेम कृतानंत शिरसाष्टांग नमस्कार विनंती विशेष. खालील मजकूर आपल्या श्रीसाईलीलेच्या एखाद्या अंकीं प्रसिद्ध करण्याची कृपेनें तसदी घ्यावी.

### बाबांची (१६॥) साडेसोळा रुपये किंवा ५२ कसी शंभर नंबराच्याही पलीकडील दक्षिणा

बाबा दक्षिणा कां मागत, किती मागत, केव्हां मागत, कोणाजवळ मागत, कोणत्या स्वरूपांत मागत व काय हेतूनें मागत, याबद्दल स्वल्पमतीप्रमाणें सविस्तर विवेचन श्रीसाईलीलेच्या ७ व्या वर्षाच्या १-२ या जोड अंकांत पूर्वींच केलें आहे. वरील १६॥ रुपये दक्षिणा पूर्वीं वर्णन केलेल्या स्वरूपांपैकींच एका स्वरूपाची आहे. पण ही कांहीं और दर्जाची आहे, व ती बाबांनीं, माझ्या माहितीप्रमाणें, त्यांच्याकडे येणाऱ्या असंख्य भक्तवृंदांपैकीं फक्त एकाच परमभाग्यशाली भक्तवर्याकडे मागितली. म्हणून तिच्याबद्दल आज दोन शब्द लिहिण्याचें योजिलें आहे.

सन १९१४ च्या मे महिन्याच्या ४ तारखेस सुरत जिल्ह्यांतील चिखली गांवाहून कुटुंब व मुलाबाळांसह निघून तारीख ५ रोजीं मी श्रीक्षेत्र शिरडी येथें पोंचलों. त्या दिवशीं मंगळवार होता. श्रीद्वारकामाईंत जाऊन श्री. द्वारकाधीश बाबांना एक रुपया दक्षिणा देऊन त्यांच्या चरणीं मस्तक ठेविलें. कै. भक्तवर्य जनार्दन धोंडदेव ऊर्फ अण्णासाहेब करंदीकर व निकाबलीचा कावजी पाटील या उभयतांनीं प्रत्येकीं दिलेला एकेक रुपया श्रीचरणीं अर्पण करून वंदन केलें व काकासाहेब दीक्षितांच्या वाड्यांत आलों. इतक्यांत श्रीमंत कै. बापूसाहेब बुटीबरोबर बाबांकडून निरोप आला कीं (३०) तीस रुपये घेऊन ये. लागलीच मी ३० रुपये घेऊन गेलों. बाबा आनंदांत होते. बाबा म्हणाले, "कांहीं दक्षिणा देतां का?"

मी म्हटलें, "बाबा, किती देऊं ?" बाबा म्हणाले, "द्या ३०-४० रुपये." मी दोन ( सॉव्हरिन ) गिनी घेऊन गेलों होतों. त्याच दोन गिनी श्रीबाबांच्या चरणीं अर्पण करून त्यांच्या चरणाचें वंदन केलें. बाबा म्हणाले, "आणखी १५ पंधरा रुपये द्या." मी विन्हाडीं गेलों व आणखी (१५) पंधरा रुपये आणून श्रींच्या हातांत दिले. नंतर केव्हां आला, कोठें उतरला वगैरे बाबांनीं मजजवळ चौकशी केली.

बुधवारीं सकाळीं दर्शनास गेलों. बाबा आनंदांत होते. कोण कोण आलांत, एकटेच आलांत का आणखी कोणी बरोबर आणलें आहे, वगैरे चौकशी करून बाबा म्हणाले, " (३०) तीस रुपये दक्षिणा घेऊन या." बिन्हाडीं जाऊन ३० रुपये आणिले व बाबांच्या हातांत देऊन त्यांच्या पायांचें वंदन केलें. दुपारीं काकासाहेबांच्या वाड्यांत निजलों असतां, बाबांच्या-कडून बोलावणें आलें; येतों म्हणून सांगितलें. शौचास लागली होती, म्हणून शौचास जाऊन नंतर गेलों; म्हणून जरा उशीर लागला. मला पाहतांच का, निजलां होतां का ? असें बाबांनीं मला विचारलें. मी होय म्हणून सांगि-तलें.बरें,चार गिन्या व (१६॥) साडेसोळा रुपये इतकी दक्षिणा घेऊन या, असें बाबा म्हणाले. घेऊन येतों म्हणून मीं सांगितलें. पण (१६॥.) साडे-सोळा नकोत. फक्त चार गिन्या व (१५) पंधराच रुपये घेऊन या, असें बाबा म्हणाले. आणून देतों असें सांगून मी बिन्हाडीं निघून गेलों. इतक्यांत जवळ बसलेल्या मंडळीजवळ बाबा म्हणाले, "आतां गेला हा भटया पूर्वी येथें आला होता. त्यानें मला शंभर रुपये दक्षिणा दिली व तो वाड्यांत गेला व त्याचें मन फार कळमळूं लागलें. तेव्हां तो माझ्याकडे आला व पैसे परत मागूं लागला. तो म्हणे पैसे परत दे. मी म्हणें परत देत नाहीं. मग म्यां त्याला खूप शिव्या दिल्या. तो रागावला व वाड्यांत जाऊं लागला. खालीं उभा राहिला. मी म्हणालों तूं कुठें जाशील ? वाड्यांत गेलास तर तेथें मला नाहीं का येतां येणार ? तूं जिथें जाशील तिथें मी येईन. तुला मारीन, तुझे तुकडे तुकडे करीन. तो तसाच जाऊं लागला. मी त्याच्या मागें

चाललों. तो साठेसाहेबांच्या वाड्याजवळ गेला. मी तेथें गेलों. तेथें साठेसाहेब भेटला. त्यास मी सांगितलें कीं, "ह्या भटयानें मला शंभर रुपये दिले आहेत, व तो आतां परत मागतो. त्याला तूं (४००) चारशें रुपये दे. पहिल्यानें हा भटया मला लई भीत होता. पण तो आतां भीत नाहीं. मी त्याला आतां शिव्या देत नाहीं. ह्या भटयाचें लइ लइ चांगलें आहे." (ही हकीकत मला मी चार गिन्या पंधरा रुपये घेऊन गेल्यानंतर कै. बापूसाहेब जोगांनी सांगितली.) बिऱ्हाडांतून मी चार गिनी व पंधरा रुपये आणिले व श्रींच्या हातीं देऊन त्यांच्या पायांचें वंदन केलें. श्री म्हणाले, "बरोबर माणसें कोण कोण आणली आहेत ?" मातुःश्री, कुटुंब व मुलें वगैरे बरोबर आणली आहेत म्हणून मीं सांगितलें.

गुरुवारीं सकाळीं दर्शनास गेलों. चरणकमलांचें दर्शन घेतलें. बाबा आनंदांत होते. बाबा म्हणाले (३०) तीस रुपये दक्षिणा द्या. बिऱ्हाडीं गेलों व ३० रुपये आणून बाबांच्या हातांत दिले व त्यांच्या चरणांचें वंदन केलें, व दोन पायावरच बसलों. बाबा म्हणाले, असे काय बसतां ? नीट बसा. मी नीट मांडी घालून बसलों, व नंतर बाबांची आज्ञा घेऊन बिऱ्हाडीं ( साठेसाहेबांच्या—आतां नवलकरसाहेबांच्या वाड्यांत बा. साहेब जोगांच्या बिऱ्हाडीं ) गेलों. दुपारी ३-३॥ वाजण्याच्या सुमारास बाबांच्या कडून बोलावणें आलें. गेलों. बसलों. (१५) पंधरा रुपये घेऊन या असें बाबा म्हणाले. बिऱ्हाडीं जाऊन पंधरा रुपये आणून बाबांच्या हातीं दिले व त्यांचें चरणवंदन केलें. श्री म्हणाले, "नाना, इथें आला होता. त्यास मी तुमच्या-कडे पाठविला होता. तो तुम्हाला भेटला का ?" मीं म्हटलें नाहीं. "नाहीं कसा ? मीं मुद्दाम तुम्हाकडे पाठविला, आणि तुम्हाला कसा भेटला नाहीं ?" मी म्हणालों, "मला भेटले नाहींत." "बरें, नसेल भेटला," असें बाबा म्हणाले. "आणि तो फकीरबुवा तुम्हास भेटला का नाहीं ?" मीं म्हटलें, "नाहीं." "जातां जातां तुमच्याकडे वळून जा, असें मीं त्यास सांगितलें होतें." (फकीरबोवा म्हणजे मालेगांवचा बडा बाबा) "बरें, नसेल आला,"

बडे बाबा त्या दिवशीं दुपारीं काकासाहेब दीक्षितांच्या वाड्यांत येऊन कै. भक्तशिरोमणी श्री. बाळकराम यांची चौकशी करून गेले. त्या वेळीं मी निजलों होतों. निजून उठून बाबांच्या दर्शनास गेलों व घरीं (चिखलीस) परत जाण्याची आज्ञा मागितली. "उद्यां बापूसाहेब आल्यावर जा" असें बाबा म्हणाले.

शुक्रवारीं सकाळीं जातों म्हणून सांगण्यास श्रीद्वारकामाईंत गेलों. बाबा बसले होते. आनंदांत होते. आज जातों म्हणून मी म्हटलें. "बापूसाहेब आला का?" म्हणून बाबांनीं मला विचारलें. "नाहीं" म्हणून मीं सांगितलें. "आज सांजचा नाहीं तर सकाळचा येईल. मग तूं जा" असें श्री म्हणाले. मी श्रीयुत माधवराव देशपांडे यांना बरोबर घेऊन रजा विचारण्याकरितां पुन्हा गेलों. यांची रजा संपली आहे, त्यांना आतां जाऊंदे, असें सांगून माधवरावांनी मला देण्याकरतां बाबांच्या हातांत उदी दिली. बाबांनीं ती माझ्या कपाळीं लावून माझ्या हातीं दिली, व म्हणाले, "बरें तर जा, पण मला (१५) पंधरा रुपये आणून दे." "बरे, आणून देतों," असें म्हणून जाऊं लागलों. इतक्यांत पुन्हा परत बोलाविलें व सांगितलें "कीं तूं सकाळीं जा. (१५) पंधरा रुपये आणून दे." नंतर बायकामुलांची व इतर बरोबर आलेल्या मंडळीची परवानगी विचारली. बाबा म्हणाले, "त्यांना जाऊं दे; तूं उद्यां जा;" सर्व मंडळीस रवाना केलें. मी व तीं. आबदूताई ( माझ्या थोरल्या भगिनी ) असे दोघेजण राहिलों. गोदावरीमाईस एकाएकीं अतिशय पूर आल्यामुळें तेथें पुष्कळ खोटी झाली व त्यामुळें कल्याणाकडे जाणाऱ्या मंडळीची सकाळची गाडी चुकली. खाण्यापिण्याचे फार हाल झाले. नंतर कल्याणकडील मंडळी रात्रीच्या गाडीनें गेली.

माझ्या कुटुंबास शुक्रवारचा उपवास होता. सकाळची गाडी चुकल्यामुळें व कोपरगांवच्या स्टेशनवर कांहीं सोय नसल्यामुळें तेथें उपास सोडतां येईना. संध्याकाळीं कल्याणास पोंचूं अशा समजुतीनें बरोबर फराळाचें

किंवा जेवणाचें कांहींच सामान घेतलें नव्हतें. असो. बाबांची आज्ञा मोडून जाण्यामुळें फजिती होऊन आपत्ति भोगावी लागली.

शुक्रवारीं दुपारीं आरतीच्या वेळीं मला बाबांच्याकडून बोलावणें आलें. लागलीच गेलों. "पैसे आणले का?" म्हणून बाबांनीं विचारलें. "हो" म्हणून रुपये १५ पंधरा बाबांच्या हातीं दिले व त्यांच्या चरणांचें वंदन केलें. बिऱ्हाडीं गेलों. तिसऱ्या प्रहरीं पुन्हा काकासाहेब दीक्षितांचा कारकून बोलवावयास आला. गेलों. "आपा तुला बोलवावयास आला होता का?" असें बाबांनीं विचारलें. त्या कारकुनाचें नांव आपा आहे असें मला माहित नव्हतें, म्हणून मी नाहीं म्हणून सांगितलें. "कोणी तरी बोलवावयास आलें होतें काय?" असें विचारतां मी "होय" म्हणून सांगितलें. (३०) तीस रुपये दक्षिणा आणून दे, असें श्री. म्हणाले, आणून देतों असें सांगून मी बिऱ्हाडीं गेलों. पण मजजवळचे सर्व पैसे संपले होते. म्हणून मी माधवराव देशपांडे यांच्याकडे ५० रुपये उसनवार मागितले. त्यांनीं पन्नास रुपयांची नोट मला दिली. ती मी कै. बाळाभाऊ चांदोरकरांकडे मोडावयास दिली. त्यांनीं मला त्या नोटीचे दहाच रुपये आणून दिले! पन्नास रुपयाच्या नोटीचे १० च रुपये कसे देतां म्हणून विचारतां तुमची नोट मी दहाचीच समजून मारवाड्याकडून दहा रुपये आणिले व तुम्हास दिले असें बाळाभाऊ म्हणाले. मारवाड्यास विचारतां तो म्हणाला कीं, मजजवळ पैसे नव्हते; म्हणून ती नोट मी एका घोड्यावर बसून जाणाऱ्या वाटसरू व्यापाऱ्यास दिली, व त्याच्याकडून पैसे घेतले व ते बाळाभाऊस दिले. एवंच, पन्नास रुपयांच्या नोटीचे दहा रुपये हातांत आले. आतां बाबांना (३०) तीस रुपये कसे द्यावे म्हणून पंचाईत पडली. माधवरावांनीं ही हकीकत बाबांना सांगितली. बाबा म्हणाले, नोट जिरवली का रे? बरें, "जो करील तो भरील." बाळाभाऊंनीं दिलेले १० रुपये बाबांना दिले व वंदन केलें.

शनिवारीं सकाळीं विचारावयास गेलों, तेव्हां बाबा म्हणाले, "आरती झाल्यावर जा. पण १५ रुपये दक्षिणा आणून दे." "देतों" म्हणून सांगून बिऱ्हाडीं गेलों. १५ रुपये आणून श्रींच्या करकमलीं ठेविले व त्यांचे चरण वंदन केले. नंतर वाड्यांत आलों व काकासाहेब दीक्षितांजवळ बोलत बसलों. त्यांना मी शिर्डीस प्रथम कसा गेलों, मला तत्संबंधीं स्वप्न काय पडलें, ही हकीकत, तसेंच निकाबलीच्या कावजी पाटलांची हकीकत, श्री. ज्ञानेश्वरी वाचण्याच्या आज्ञेसंबंधीं हकीकत, व बुधवारीं बाबांनीं मजजवळ प्रथम ४ गिनी व १६॥- रुपये मागितले व नंतर, नको चार गिनी व पंधराच रुपये दे असें म्हणाले ही हकीकत सांगितली.

आरतीच्या वेळीं काकासाहेबांबरोबर द्वारकामाईंत गेलों व त्यांच्याच शेजारीं पण सद्गुरुरायासन्निध बसलों. इतक्यांत काकासाहेबांस बाबा म्हणाले, "काय रे काका, ह्याच्याशीं (माझ्याशीं) आज काय बोलणें चाललें होतें?" काकासाहेब म्हणाले "त्यांनीं (मी) मला आज आपलें पहिलें स्वप्न सांगितलें, त्या स्वप्नांत ते शिर्डीस येण्यापूर्वी ६ महिने आपण त्यांना नानासाहेब चांदोरकरांसह दर्शन दिलेत. नंतर मूर्त स्वरूपांत आपणांस सद्गुरु मिळावे अशी त्यांना तळमळ लागली. नंतर ६ महिन्यांच्या आंतच त्यांना आपलें प्रत्यक्ष दर्शन झालें." मग बाबा म्हणाले, "अरे, पण त्याला (मला) सद्गुरु मिळाले का?" काकासाहेब म्हणाले, "हो, मिळाले; आपणच सद्गुरु." तेव्हां बाबा "हं" म्हणून मोठ्यानें हंसले.

नंतर काकासाहेबांनीं बाबांना विचारलें कीं, बाबा, "आपण ह्याच्या-जवळ ( माझ्याजवळ ) ४ गिनी व १६॥- रुपये मागितले, व नंतर १६॥- नको, चार गिनी व १५ रुपये दे म्हणून सांगितलें. पण ह्याचा अर्थ कांहीं कळला नाहीं." बाबा म्हणाले कीं, "तें मोघमच आहे; समजेल पुढें केव्हां तरी."

नंतर बाबा मला म्हणाले कीं, "तूं मला किती गिनी दिल्यास त्याचा आपण हिशोब करूं." मी म्हटलें, मीं "आपल्यास चार गिनी दिल्या, त्याचा हिशोब कसला करावयाचा ?" बाबा म्हणाले, "अरे हो, तें खरें, तूं चार गिनी दिल्यास, मी कोठें नाहीं म्हणतों ? पण आपल्यास नाही पोंचल्या बबा चार गिन्या ! बाबाला पोंचली एक." मीं म्हटलें, "बाबा, हा कुठला हिशोब ? मी तर आपणास चार गिनी दिल्या." बाबा म्हणाले, "अरे हो, मी कुठें म्हणतों कीं तूं चार गिन्या नाही दिल्यास ? तूं दिल्यास चार गिन्या पण मला पोंचली एक." मीं म्हटलें, "हा कुठला हिशोब ?" बाबा म्हणाले, "तूं सध्या इतकेंच लक्षांत ठेव कीं, बाबांस चार दिले म्हणजे एक पोंचलें." मीं म्हटलें, बाबा, मी हें लक्षांत ठेवतों; पण मला हें समजेल का ?" बाबा म्हणाले "होय, समजेल; पण अजून अवकाश आहे. पुढें समजेल."

मीं प्रथम बाबांच्या दर्शनास शिरडीस गेलों, तेव्हां त्यांच्या चरणीं एक रुपया दक्षिणा ठेविली. आणखी मला "तूं दोन रुपये दे" असें बाबा म्हणाले. मीं लागलीच दिले. नंतर बाबांनीं मजजवळ आणखी ६ सहा रुपये दक्षिणा मागितली व तीही मीं तावडतोब दिली माझे कुटुंबानींही प्रथम एक रुपया दक्षिणा दिली. व बाबांनीं त्यांच्या पासूनही आणखी दोन रुपये जास्त मागून घेतले. ही हकीकत मीं नानासाहेब चांदोरकर यांना सांगितली. ते म्हणाले, तुम्हाला बाबांनीं उपासना दिली. ती कोणती दिली व उपासना कशी करावी हें मी तुम्हांस सांगेन. त्याप्रमाणें ती मला त्यांनीं सांगितली, त्यांच्या सांगण्यांतही चार म्हणजे एक असे आलें. पण त्या वेळीं तें मला कळलें नाहीं व बाबांनीं तूं चार गिन्या दिल्यास, पण मला पोंचली एक असें सांगितलें त्या वेळींही त्यांतील रहस्य कळलें नाहीं. पण पुढें कांहीं कालानें नानासाहेबांच्या व बाबांच्या सांगण्याचा विचार करून मनन करूं लागलों तों एकदम चटकन् प्रकाश पडून अत्यानंद झाला ! ते गूढ रहस्य

व तो परमानंद येथें लिहिण्याची किंवा कोणास सांगण्याची मला प्रेरणा होत नसल्यामुळें व प्रस्तुत तो प्रतिपाद्य विषय नसल्यामुळें चार म्हणजे एक हें रहस्य मी तूर्त तरी मोघम ठेवतों. याबद्दल सहृदय वाचक मला क्षमा करतील.

आतां मी १६॥ च्या रहस्याकडे वळतों. शेजारती आरती झाल्यावर व आरतीपूर्वी मी काकासाहेबांजवळ बोलत बसलों. मी त्यांना चार गिनी व १६॥ रुपयांची हकीकत सांगितली, वगैरे वर लिहिलेली हकीकत वाचकांच्या लक्षांत असेलच, काकासाहेबांनीं स्वतःच्या अनुभवाच्या कित्येक बाबांच्या लीला मला सांगितल्या व म्हणाले कीं, अशीच एकदा बाबांनी कै. भक्तश्रेष्ठ बाळासाहेब भाटे पेन्शनर मामलतदार यांच्याजवळ (१६॥) साडेसोळा रुपये दक्षिणा मागितली. बाळासाहेबांनीं अकालीं पेन्शन घेतल्यामुळें त्यांना मोठ्या शिकस्तीनें पेन्शन रुपये ३० मिळत असे व घरांत खाण्यास मंडळी पुष्कळ—५-६ होती. तेव्हां त्यांच्याजवळ १६॥ रुपये दक्षिणा कोठून असणार, हें अंतरसाक्षी गुरुरायांना माहित होते. तरी पण त्यांनीं त्यांच्या जवळ १६॥- रुपये दक्षिणा मागितली व बजावलें कीं. बघ, बाळासाहेब बरोबर (१६॥-)साडेसोळा रुपये आण बरं. वरचे आठ आणे कमी करूं नकोस. आठ आणे सुद्धा मला पाहिजेत. लक्षांत ठेव. बाळासाहेब म्हणाले, बाबा, मजजवळ तर कांहींच नाहीं, हें आपल्यास माहित आहेच. बाबा म्हणाले, जा काकाकडे ( काकासाहेब दीक्षित ) म्हणजे तो देईल. आज्ञेप्रमाणें बाळासाहेब ( काकाकडे ) मजकडे आले व म्हणाले मला बाबांनीं आपल्याकडे पाठविलें आहे. मजजवळ त्यांनीं १६॥- रुपये दक्षिणा मागितली—मजजवळ नाहीं म्हणून मीं सांगितलें. काकाकडे जा म्हणजे तो देईल अशी आज्ञा झाल्यावरून आपल्याकडे आलों. आहें. मी त्या वेळीं श्री एकनाथी भागवतांतील दुसऱ्या अध्यायांतील ३५ श्लोकापुढील श्लोक वाचण्यास सुरवात करणार होतों. कोणी पोथी वाचीत असला व त्याच्या-

कडे बाबांनीं कोणास जावयास सांगितलें कीं, नक्की समजावें कीं, त्याच्या शंकेचें किंवा प्रश्नाचें किंवा अडचणीचें उत्तर त्या वेळीं तो इसम वाचीत असलेल्या ग्रंथांत किंवा पोथीच्या भागांत असावयाचें. मी बाळासाहेबांस म्हटलें कीं, बाबांच्या बोलण्याचा अर्थ निराळाच असला पाहिजे. पाहतों या पोथींत कांहीं निघतें का ! वाचावयाचा श्लोक ३६ वा निघाला. तो मुद्दाम काढला नव्हता. अनुक्रमानेंच आला. तो असा:—

## इंद्रवज्रावृत्तम्

कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा । बुद्ध्यात्मना वाऽनुसृत स्वभावात् ॥
करोति यद्यत्सकलं परस्मै । नारायणायेति समर्पयेत्तत् ॥ ३६ ॥

या श्लोकाचा सरळ अर्थ असा आहे कीं, शरीरानें, वाणीनें, मनानें इंद्रियांनीं (म्हणजे पंच ज्ञानेंद्रियांनीं-नेत्र, कर्ण, घ्राण, जिव्हा, व त्वचा-व पंच कर्मेंद्रियांनीं-हस्त, पाद, वाचा, वायु ( गुदद्वार ) उपस्थ ( जननेंद्रिय ) बुद्धिनें, अहंकारानें व प्रकृतिस्वभावानें म्हणजे या एकंदर षोडश द्वारांनीं मनुष्य जें जें कर्म करितो, तें त्यानें परमश्रेष्ठ असा जो भगवान् नारायण त्यास समर्पण करावें.

वरील श्लोकांत आपल्यास तुमचे सोळा रुपये तर मिळाले, पण अर्ध्या रुपयाचा पत्ता लागत नाहीं; तो नाथ भाष्यांत कोठें असेल तर पाहूं. नंतर मी भाष्य वाचूं लागलों व त्यांत मला "चित्त" म्हणून आणखी एक द्वार मिळालें. चित्तानें होणारीं कर्में ही परमात्मास अर्पण करावीं असें नाथांनीं म्हटलें आहे. यावरून मूळ श्लोकांत स्पष्टरीतीनें नसलेलें, पण त्याचा समावेश वरील श्लोकांत होतो, असा नाथांचा स्पष्ट अभिप्राय आहे. पण नाथांनीं चित्त हें सबंध १७ वें द्वार न घेतां अर्धेंच घेतलें असलें पाहिजे; त्याशिवाय बाबा १६॥ सांगणार नाहींत हें खास. म्हणून तुम्ही बाबांना

लौकिकी १६॥ रुपये न देतां वरील श्लोकांत व नाथभाष्यांत वर्णन केल्या-प्रमाणें तुमच्या १६॥ द्वारांनीं जीं जीं कर्में होतील, तीं तीं तुम्हीं बाबांना अर्पण करावीं असा बाबांचा अर्थ आहे असें दिसतें. असें मी बाळासाहेबांना सांगितलें व तें त्यांना पटलेंही, असो.

आतां काळजीपूर्वक वाचणाऱ्या भक्तवाचकांना वरील काकासाहे-बांनी केलेल्या श्लोकाचें अर्थात् दोन शंकास्थळें दिसतील. वरील श्लोकांत वाचा हें द्वार किंवा तत्त्व दोन वेळा येतें. "कायेन वाचा" येथें "वाचा" शब्दाचा उल्लेख आहे. व पंच कर्मेंद्रियांतही वाचा हें तत्त्व आहे. परंतु माझ्या स्वल्पमतीप्रमाणें या दोन वाचातत्त्वांत फरक आहे व म्हणूनच त्याचा उल्लेख दोन वेळा आला आहे. वाचा चार आहेत परा, पश्यंती, मध्यमा व वैखरी. या चारी वाचेचीं स्थानें, कार्य व स्वरूपें शरीरांत कोठें व कशी आहेत हें श्रीसमर्थ सद्गुरु रामदासस्वामी महाराज यांनी आपल्या श्रीदासबोधांत सुंदर प्रकारें वर्णिलें आहे.

उन्मेष परा, ध्वनी पश्यंती । नाद मध्यमा शब्द चौथा ।
वैखरीपासून उमटती । नाना शब्दरत्नें ॥ ८ ॥ दशक १२ स. ५

तसेंच नाभीपासून उन्मेषवृत्ति । तेचि परा जाणिजे श्रोतीं ।
ध्वनीरूप पश्यंती । हृदयीं वसे ॥ १ ॥
कंठापासून नाद जाला । मध्यमा वाचा बोलिजे त्याला ।
उच्चार होता अक्षराला । वैखरी बोलिजे ॥२॥ द. १७·स. १८

या चार वाचांपैकीं पहिल्या तीन अनिर्वाच्य किंवा मौन वाचा व चौथी वाच्य किंवा श्रवणक्षम म्हणजे दुसऱ्यास ऐकूं येईल अशी शब्द किंवा अक्षरवाणी असें कायेन "वाचा" या श्लोकांवरील नाथ भाष्यावरून दिसतें. एकदा परमात्म्याला मौनानें म्हणजे निःशब्द वाचेनें केलेलें कर्म समर्पण करावयाचें, व एकदा वाच्य किंवा वैखरीनें केलेलें कर्म समर्पण करावयाचें.

"कायेन वाचा" यांतील वाचेचा अर्थ मौन किंवा निःशब्द वाचा व "इंद्रियैर्वा" यांपैकीं कर्मेंद्रियांतील वाचेचा अर्थ बाह्य किंवा वैखरी वाचा.

श्रीसमर्थ नाथ महाराज लिहितातः—

शब्द मावळे निःशब्दीं । निःशब्दचि बोलिजे शब्दीं ।
तोचि अर्पणाचा विधि । जाण त्रिशुद्धी समर्पि ते निर्शी ॥३९१॥
बोलु बोलविता बोला आंत् । तो बोलू आपणेसींचि येत् ।
ऐसा शब्देंचि भजनार्थ् । प्रगटे परमार्थ् ब्रह्मार्पणेंसीं ॥ ३९२ ॥

पहिल्या ओवींत निःशब्दानें म्हणजे मौनानें भजन करून तें भजनरूप कर्म परमात्म्यास समर्पण करावयाचें, व दुसरे ओवींत वैखरीनें भजन करून तें भजनरूपकर्म परमात्म्यास अर्पण करावयाचें, असें आहे. यावरून मूळ श्लोकांत वाचेचा जो दोन वेळा उल्लेख आहे तो यथायोग्य आहे. वैखरी वर्णन करून थकली व आपण केलेलें वर्णन परमात्म्याच्या अनंत गुणांच्या दृष्टीनें अपुरेंच पडतें, अशी जेव्हां तिची खात्री होते, तेव्हां ती तें काम मौन-वाचेवर सोंपविते.

भगवान चिद्रत्न श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं श्रीज्ञानेश्वरींत परमात्म्याची व गुरुरायाची स्तुति प्रथम वैखरींत करून ती स्तुति अपुरी पडते; असें पाहून तुमची स्तुति मौनानेंच करणें भलें, असें ठिकठिकाणीं म्हटलें आहे.

म्हणूनि सत्यचि तुजलागीं । स्तुति न देखों जों जगीं ।
मौनावांचूनि लेणें आंगीं । नुसीवा मा ॥ २४ ॥ अ. प्रथम स्तवन.
स्तुति कांहीं न बोलणें । पूजा कांहीं न करणें ॥२५॥ सदर
मौन गा तुझें राशि नांव । आतां स्तोत्रीं कें बांधों हांव ॥१५॥ अ. १७ प्र.स्त.
जो सर्व नेणिवा जाणिजे । मौनाच्या मिठिया वर्णिजे ॥१९॥ अ. १६ प्रथम स्तवन
स्तुती सांडोनी निवांता । चरणीं ठेविजे माथा ॥१५ ॥ अ. १० प्रथम स्तवन
तेसी स्तुतींचीं बोलणीं । उगियाचि माथा ठेविजे चरणीं ॥१६॥ अ. १४ प्र.स्त.

यावरून "कायेन वाचा" या श्लोकांत वाचेचा उल्लेख दोन वेळा आला आहे, तो यथार्थ आहे. (अपूर्ण)

# अध्याय २०

श्रीगणेशायनमः ॥ हे मूषकवाहन मयूरेश्वरा ॥ भालचंद्रा फरशुधरा ॥ तूं वंद्य असशी सुरासुरां । नमन माझें हें तुसी ॥ १ ॥ बनवसग्रामामाझारीं । बसले अपादेव गादीवरी । माधवाचार्याच्या निर्धारीं । सांप्रदाय चालविला ॥ २ ॥ आचार्यांची थोरली सून । नाम जिचें कृष्णा जाण । ही माहेरीं होती म्हणून । मरी सग्रांत वांचली ॥ ३ ॥ तीस अपांनीं आणविलें । बनवसामाजीं ठेविलें । तिच्या आज्ञेत वागले । वंश गुरुचा म्हणून ॥ ४ ॥ अपादेव उर्ध्वरेत । जैसे स्वामी कार्तिक सत्य । वा शुकाचार्य कलींत । वाटतें दुजे अवतरले ॥ ५ ॥ योगमार्गी निष्णात । आसने मुद्रा अवगत । कुंडलिनीचे भेद समस्त । कळले गुरुमुखानें ॥ ६ ॥ नित्य समाधि लावून । ब्रह्मानंदीं होती लीन । इंद्रियांचें केलें दमन । योगबलानें देवांनीं ॥ ७ ॥ समाधि बांधिली सद्गुरुची । माधवाचार्य महाराजांची । वारी माहूर पंढरीची । करूं लागले प्रतिवर्षी ॥ ८ ॥ सोळा वर्षपर्यंत । अपांनीं हें चालविलें व्रत । पुढें विचार मनांत । केला महायात्रेचा ॥ ९ ॥ करून अवघी तयारी । उभे ठाकले बद्ध करीं । समाधिच्या समोरीं । आपल्या गुरुरायाच्या ॥ १० ॥ हे माधवाचार्य गुरुनाथ । सेवा आजपर्यंत । एक नित्य होवून सत्य । केली असे दयाळा ॥ ११ ॥ आतां मनोहर देवासी । देऊन माळविण्यासी । जातों महा यात्रेसी । मी हा तुझा पदरज ॥ १२ ॥ माझा अंत उत्तर देशीं । हें मी जाणिलें मानसीं । तुझ्या कृपेनें पुण्यराशी । जाण्यास आज्ञा असावी ॥ १३ ॥ जैसी कन्या सासऱ्याप्रती । जातां होते तिची स्थिती । तीच झाली निश्चिती । अपादेवांची सर्वथा ॥ १४ ॥ केला शेवटचा नमस्कार । बहुत मंडळी बरोबर । आले जांभुळ बेटावर । मनोहरासी भेटावया ॥ १५ ॥ विणा चिपळ्या तुळसीमाळा मनोहराच्या घातली गळां । जाऊनियां बनवसाला । रहा म्हणून सांगितलें ॥ १६ ॥ सप्त पुऱ्या हरिद्वार । मारवाड देशीं पुष्कर ।

गंगोत्री हिंगलाज साचार। करून आले कुरुक्षेत्रीं ॥ १७ ॥ त्या कुरुक्षेत्रांत। अपा आले मंडळीसहित। अश्विनमास होता सत्य। दिवस विजयादशमीचा ॥ १८ ॥ स्नान संध्या करूनी। अप्पा बैसले पूजासनीं। षोडशोपचारें चक्रपाणी। श्रीविठ्ठल पूजिला ॥ १९ ॥ घेऊन मूर्ति हातावर। विनवूं लागले साचार। हे दीनानाथ सारंगधर। लोभ आतां असूं दे ॥ २० ॥ तूं पूर्णब्रह्म त्रिगुणातीत। तूं विश्वरूपी विश्वनाथ। तुझा कोणा न लागला अंत। वेद ह्मणे नेति नेति ॥ २१ ॥ तुझें रूप आहे ऐसें। हा निश्चय ना करवतसे। जैसा भाव तैसा दिसे जगदोद्धारा विश्वंभरा ॥ २२ ॥ उद्यांपासोन कैंची पूजा। तुझी घडते अधोक्षजा। माझ्या करें पंढरीराजा। हीच असे शेवटची ॥ २३ ॥ ऐसें बोलोन पदीं डोयी। ठेविली अप्पांनीं लवलाहीं। नेत्रीं अश्रु आले पाही। रोमांच उठले शरीरा ॥ २४ ॥ निर्याणाचें वर्तमान। शिष्य सखारामालागून। त्या वेळींच केलें कथन। मूर्ती प्रसादून विठ्ठलाची ॥ २५ ॥ उद्यांपासून नवज्वर। होणार मसी साचार। आज भोजनाची अखेर। अवघे या मम पंक्तीसी ॥ २६ ॥ अवघी मंडळी चिंतातुर। दुसरे दिवशीं भरला ज्वर। अहोरात्र नामगजर। ठेविला सुरू शिष्यांनीं ॥ २७ ॥ संवत येकूणीश्यासी। अश्विन वद्य अष्टमीसी। अपा महाराज वैकुंठासी। गेले कुरुक्षेत्रांत ॥ २८ ॥ पुढें अवघ्या मंडळीसी॥ घेऊन सखाराम वनवासासी। आला मनोहर देवासी। वृत्त अवघें कळविलें ॥ २९ ॥ त्यांनीं देवमाळा अपाची। जयवंतरावासी दिली साची। पंढरीच्या वारीची। आज्ञा केली तयाला ॥ ३० ॥ पवढें चालवी गुरुव्रत। ऐसे वदले तयाप्रत। इकडे सखाराम चित्तांत। खिन्न तेणें जाहला ॥ ३१ ॥ त्याचा मनोदय जाणूनी। मनोहर बोलिले मधुरवचनीं। वेड्या न खिन्न व्हावें मनीं। वचन ऐक हें माझें ॥ ३२ ॥ माझ्या मागें कांहीं दिवस। तुज बसणें या गादीस। म्हणून म्यां जयवंतास। माळ

मूर्ति अर्पिली ॥ ३३ ॥ सखारामाचें समाधान। ऐशा रीति करून। सांप्रदाय राहिल्यासमान । मनोहरानें चालविला ॥ ३४ ॥ दाजी पुत्र गोपाळाची। मौंज यांनीं केली साची । संत माय अनाथाची। जगत्रया निश्चयें ॥ ३५ ॥ सोळा वर्षे सांप्रदायासी । चालवून वनवसाळी। मासोत्तम श्रावणमासीं ।आले जांभुळ बेटातें ॥ ३६ ॥ चाकुरकर विठ्ठलशास्त्रीसी । वाहिले देवांनीं भेटीसी। ते येतांच कंठासी। मिठी त्याच्या घातली ॥ ३७ ॥ तूं माझा सहोदर। गुरु-भक्त परम उदार। पवढी भिक्षा अखेर। घालीं मसी बंधुराया ॥ ३८ ॥ हें शरीर नाशवंत। विरावें गोदाप्रवाहांत। ऐसी इच्छा मनांत । झाली ती पूर्ण करीं ॥ ३९ ॥ विठु तात्या धरणीधर। जोशी आणि भक्त इतर। शास्त्रयास बोलिले जोडून कर। जल-प्रवाहा न संमति द्या ॥ ४० ॥ अध्यात्म निरूपण ते वेळा। कथिलें अवघ्या लोकांला । ज्या योगें दूर झाला । मोह जनांचा तात्काळ ॥ ४१ ॥ अध्यात्माचें निरूपण । मागेंच बोलिले साधुजन। पातंजली विद्यारण्य । मुकुंद राजा महात्मा ॥ ४२ ॥ ज्ञानेश्वर एकनाथ । श्रीरामदास स्वामी समर्थ । तुकारामादि भगवद्भक्त । अध्यात्माचे वाटाडे ॥ ४४ ॥ कपीलगीता भग-वतद्गीता । भाष्य पंचदशी तत्वतां । विवेकसिंधुची योग्यता। काय वर्णन करावी ॥ ४५ ॥ अध्यात्माची केवळ दरी । ग्रंथराज ज्ञानेश्वरी । नाथ भगवंत तैशापरी । दासबोध समर्थांचा ॥ ४६ ॥ अभंग तुकारामाचे । प्रति रहस्य वेदाचें। ह्या अवघ्या महात्म्याचे । उपकार झाले जगावर ॥ ४७ ॥ ऐशा ज्ञानी महात्म्यांचा। अधिकार अध्यात्म वर्ण ज्याचा। तेथें माझा नाकडाचा । काय पाड सांगा हो ॥ ४८ ॥ सुवर्ण पुतळा त्यांची कृति । दैदिप्यमान मान जैसा गभस्ती । माझी वाणी तयावरती । कल्हई होईल कथलाची ॥ ४९ ॥ हे वरील अवघे ग्रंथ । होते मनोहरा अवगत । शाब्दिक ज्ञान नव्हतं

व्यर्थ । होते पूर्ण अनुभवी ॥ ५० ॥ अनुभवाचे वांचून । न बोलती कदा सज्जन । मूर्ख मात्र जल्पती जाण । अर्थदृष्टी होतांची ॥ ५१ ॥ गोदा प्रवाह करण्याची । केली तयारी शीघ्र साची । दिंड्या टाळ मृदंगांची । झाली गर्दी वेटांत ॥ ५२ ॥ सखारामांचिये कंठीं । माळ घातली उठाउठी । निरोप अवघ्यांचा शेवटीं । घेते झाले मनोहर ॥ ५३ ॥ संवत एकुणिशें सोळांत । श्रावण वद्यपक्षांत । दशमी गुरुवार धाद्रांत । मनोहर समाधिस्त जाहले ॥ ५४ ॥ सखारामाचे हातीं । अवघीं सूत्रें आलीं असती । आज्ञेनुरूप वर्तनी । महाराज दाजी देवांच्या ॥ ५५ ॥ एके दिनीं वनवसांत । समाधीचे दर्शनाप्रत । नेऊन मंडळी संगात । निघते झाले सखाराम ॥ ५६ ॥ हणमंतराव हरबाजी । जयवंतराव आबाजी । सोनार तो लिंबाजी । आणिक होते इतर बहु ॥ ५७ ॥ जातां जातां तळ्याची । गोष्ट निघाली तेथ साची । या बाणाईच्या तळ्याची । आहे थोर योग्यता ॥ ५८ ॥ हें गुरु तीर्थ साक्षात । ऐसें सखाराम लोकांप्रत । सांगूं लागले म्हणती येथ । आहे प्रत्यक्ष भागिरथी ॥ ५९ ॥ उद्यां अर्धोदय पर्वणी । स्नानास यावें अवघ्यांनीं त्याप्रमाणें दुसरे दिनीं । जन आले स्नानास्तव ॥ ६० ॥ सखाराम देव प्रथमता । तळ्यांत उतरले तत्त्वतां । हर हर जान्हवी वाचे म्हणतां । वर्ण पालटला पाण्याचा ॥ ६१ ॥ पाहून तें धवल नीर । लोक करिती जयजयकार । केवढा साधुचा अधिकार । वनवसीं आली भागीरथी ॥ ६२ ॥ पुढें देवास आलें वृद्धपण । शक्ति झाली बहु क्षीण । मेळवून सभ्य जन । निर्विले त्यांस ऐशा रीती ॥ ६३ ॥ गोपाळ पाटील गोपाळ मांडे । आणिक लोक वडे बडे । जमवूनियां त्यांचे पुढें । उभें केलें गोपाळा ॥ ६४ ॥ हा दाजी देवाचा सुत । वारस आमुच्या

गादीप्रत । तुम्हीं अवघ्यांनीं तदाशेंत । आजपासून वागावें ॥ ६५ ॥ ऐसें निरवून लोकांसी । शके सतराशें नव्याण्णवासी । आषाढ शुद्ध प्रतिपदेसी । देह ठेविला सखारामें ॥ ६६ ॥ हल्लीं अधिकारी गादीचे । गोपाळ देव असती साचे । कोश प्रेमणा भक्तीचे । आहेत कीं मूर्तिमंत ॥ ६७ ॥ सीता नामें यांची कांता । भोळी लक्ष्मी तत्वतां । जैसी गिरजा एकनाथा । वधू लाधली श्रोते हो ॥ ६८ ॥ पुत्र त्यांचा ऐनाथ । आहे अल्पवयी सत्य । मठाचा जीर्णोद्धार सत्य । केला गोपाळ देवानें ॥ ६९ ॥ या चारी संतांसी । नमन माझें आदरेंसी । संत हो या लेंकरासी । विसरूं नका कदाकाळीं ॥ ७० ॥ स्वस्ति श्रीसंतकथामृत । वदविता माझा पंढरीनाथ । दासगणू मी कारण मात्र । सर्व सत्ता हरीची ॥ ७१ ॥

श्रीहरिहरार्पणमस्तु ॥ शुभंभवतु ॥ ॥

॥ इति विंशोऽध्यायः समाप्तः ॥

# अध्याय २१

श्रीगणेशायनमः ॥ देवा तूं सर्वांगसुंदर । मस्तकीं शोभती दूर्वांकुर । गुंजारव घालिती भ्रमर । गंडस्थलीं मायबापा ॥ १ ॥ पायीं घागऱ्या रुणझुणती । मोदक शोभे सव्य हातीं । लंबोदरा मजप्रती । वेगें पाव गजानना ॥ २ ॥ आतां वंदन मोहिनीशा । आदिअनादि पुराणपुरुषा । संतकथा वदवीं सरसशा । देवा मम मुखानें ॥ ३ ॥ बरें वाईट जें जें घडे । तें तें अवघें तुझ्याकडे । निमित्तास मात्र पुढें । आहे तुझा दासगणू ॥ ४ ॥ श्रीगोदावरीचे दक्षिणेस । तैलंगणाचे आरंभास । कंदकुर्ती ग्रामास । श्रीधरमहाराज जन्मले ॥ ५ ॥ या कंदकुर्ती ग्रामांत । आश्वलायन शाखेंत । झाले वल्लभ दीक्षित । भारद्वाज गोत्र ज्यांचें ॥ ६ ॥ या वल्लभाचे उदरीं । जन्मले श्रीधर निर्धारीं वेदोनारायण भूमीवरी । वाटती काय अवतरले ॥ ७ ॥ घेतलें श्रौत अग्निहोत्र । श्रीमद्भागवतीं प्रेम बहुत । जें ब्रह्मविद्येचें सार सत्य । कृष्ण द्वैपायन बोलिला ॥ ८ ॥ जरि श्रीधर कर्मठ । परि न विसरला भक्ती वाट । रामकथा ऐकतां कंठ । येई ज्याचा भरोनी ॥९॥ पुराणाचीं पारायणें । असंख्य केलीं श्रीधरानें । ब्रह्मज्ञान झालें तेणें । अपरोक्ष तयालागीं ॥ १० ॥ उपास्य दैवत श्रीराम । सीतापती पुरुषोत्तम । जो सज्जनांचा विश्राम । पतीतपावन नाम जया ॥ ११ ॥ रामकथा करणें श्रवण । रामाचेंच करणें ध्यान । प्रपंच रामावांचून । कांहीं नावडे श्रीधराला ॥ १२ ॥ ज्यास झालें ब्रह्मज्ञान । तो साक्षात नारायण । जें न घडे तें घडविती जाण । अगम्य लीला तयांची॥१३॥ एके वेळीं चैत्रमासीं । श्रीरामनवमीचे उत्सवासी । अडचण पडतां घृतासी । काय घडलें तें ऐका ॥१४॥ ब्राह्मण बसले भोजनासी । पहिली वाढ कशीबशी । झाली मधल्या भातासी । तूप नुरलें वाढावया ॥ १५ ॥ अजूनी न आलें घृत । ह्मणोनी सांगती

छात्र। भथला भात परातींत। उकरिला आहे सद्गुरु ॥ १६ ॥ ऐसी देकितां छात्रवाणी। श्रीधर झाले सचिंत मनीं। कां न यावें अझूनी। घृत म्हणती बाजारचें ॥ १७ ॥ कारभारी उत्सवांत। खचित लागतो महा धूर्त। तुह्मी अजागळ अवघे सत्य। कळून आलां रे मसीं ॥ १८ ॥ जें झालें तें बरें झालें। आतां पाहिजे निवटिलें। हें जें संकट ओढवलें। मूर्तिमंत आपणापुढें ॥ १९ ॥ जा भरून आणा दोन घागरी। माय माझी गोदावरी। घृताचीच वाहे खरी। रामसेवा करावया ॥ २० ॥ मानून तें प्रमाण वचन। शिष्य घटासी घेऊन। गेले गोदेकारण। घृत आणाया साक्षेपें ॥ २१ ॥ प्रवाहाचे मध्यंतरीं शिष्य गेले निर्धारीं। बुडवितां आंत घागरी। भरून आल्या तुपानें ॥ २२ ॥ तो पाहोनी प्रकार। शिष्य आनंदले फार। अगाध सत्व श्रीधर। पुण्यपुरुष पुण्यात्मा ॥ २३ ॥ महाजलाचें होय घृत। केवढें संतांचें सामर्थ्य। नेऊन वाढिलें पंक्तींत। तेंच तूप शिष्यांनीं ॥ २४ ॥ पुढें तूप बाजारचें। भोजनोत्तर आलें साचें। मग तें नेऊन गोदेचे। सोडिते झाले प्रवाहांत ॥ २५ ॥ येणें परी पार पडला। उत्साह श्रोते तेधवां भला। पुढें वृत्तांत कैसा झाला। तो ऐका सांगतों ॥ २६ ॥ वल्लभ दीक्षित श्रीधर। यात्रेस निघाला साचार। जगन्नाथादि क्षेत्रें थोर। करून आले गोदातटीं ॥ २७ ॥ या गोदावरीचे तीरीं। राजमहेंद्री नाम नगरी। जेथून गोदा निर्धारीं। वाहती झाली सप्तमुखें ॥ २८ ॥ तें राजमहेंद्री नगर। भव्य परम सुंदर। सदनांचीं गोपुरें। गगनातें चुंबितीं ॥ २९ ॥ हा मध्य तैलंगणाचा। जंबुद्वीपीं होय साचा। आचार विचार ब्राह्मणाचा। जेथें अति उत्तम ॥ ३० ॥ ऐशा त्या राजमहेंद्रीसी। आले श्रीधर पुण्यराशी। पाहून तया क्षेत्रासी। संतोष मनीं पावले ॥ ३१ ॥ जेथ महामहा विद्वान। परी विनयसंपन्न। विनय हेंच भूषण। विद्वानांसी सर्वथा ॥ ३२ ॥ अहंपणाचें नांव नाहीं। परनिंदा न मुखीं येई। प्राणिमात्रांचिये ठायीं। प्रेमभाव जयांचा ॥ ३३ ॥ त्यासीच म्हणावें विद्वान। ऐसें म्हणती साधुजन तेच खरे

ज्ञानवान। ऐसे असंख्य लोक जेथें ॥३४॥ श्रीधर म्हणतां पित्यास। वाटतें माझिया चित्तास। या राजमहेंद्रीस। भोजन द्यावें चहूं वर्णां ॥ ३५॥ ऐसी ऐकून पुत्रवाणी। वल्लभ दीक्षित त्यालागूनी। बोलते झाले मधुर वचनीं। राम इच्छा पुरवील ॥ ३६ ॥ श्रीधरांनीं आपुला। विचार क्षेत्रस्थासीं कळविला। या राजमहेंद्री पंच-कोशीला। भोजन द्यावें वाटतें ॥ ३७ ॥ तें म्हणती क्षेत्रस्थ। हें घडणें कठीण खचित। आमच्या पंचक्रोशींत। मनुष्य आहे लक्षावधी ॥ ३८ ॥ याचा विचार करावा। मग संकल्प सोडावा। नातरी पस्तावा। करीत बसाल शेवटीं ॥ ३९ ॥ श्रीधर म्हणती त्यावरी। याचा विचार अंतरीं। पूर्वीच करुन निर्धारीं। तुम्हा-लागीं विचारिलें ॥ ४० ॥ तम्हा इतकीच विज्ञती। दुकान दावा आम्हांप्रती। कीं जो एकटाच निश्चितीं। सामान अवघें पुरवील ॥ ४१ ॥ तें म्हणती क्षेत्रस्थ। एवढा दुकानदार येथ। नाहीं आमच्या गांवांत। मिळणार तुम्हां निश्चयें ॥ ४२ ॥ असो श्रीधर महा-राज गोदेवरी। आले स्नानास सत्वरीं। ओलेत्यानें पाणी करीं। घेऊन संकल्प सोडिला ॥ ४३ ॥ हे गोदे गौतमी गंगे। भागिरथी प्रताप तुंगे। यमुने नर्मदे शिवमनरंगे। संकल्प ऐका बायांनो ॥ ४४ ॥ मी राजमहेंद्री पंचक्रोशींत। देईन आदरें भोजनास। ब्राह्मणादि चहूंवर्णास। सीतारामाप्रीत्यर्थ ॥ ४५ ॥ हा राम जानकीरमण। विराटरूपी नारायण। पुरुषसूक्तीं वर्णन। वेद याचें बोलिला ॥ ४६ ॥ मुख जयाचें ब्राह्मण। क्षत्रीय ज्याचे बाहु पूर्ण। जानु अवघे वैश्यवर्ण। शूद्रपद समर्थाचें ॥ ४७ ॥ म्हणून त्या चहूंवर्णा। मी घालितों भोजना। विराटस्वरूप नारायणा। तुष्टवायाकारणें ॥ ४८ ॥ हा तुम्ही शेवटा न्यावा। बोल खोटा न करावा। घडो ऐसीच रामसेवा। आमरणपर्यंत ॥ ४९ ॥ ऐसा करून संकल्पासी। श्रीधर आले गृहासी। जाऊनिया पेठेसी।

सामान पाहूं लागलें ॥ ५० ॥ तों राजमहेंद्रींची पेठ। भरली असे घनदाट। मोठमोठे धनिक शेट। बैसले टेंकून लोडासी ॥ ५१ ॥ महाराज येऊन दुकानासी। बोलती दुकानदारासी। सामान बहुत पाहिजे मशीं। घाल का तें सांगावें ॥ ५२ ॥ वीस खंडी पाहिजे रवा। चोवीस खंडी दुपेटा बरवा। करणें आहे माल-पुवा। श्रीरामाप्रीत्यर्थ ॥ ५३ ॥ दहा खंडी तांदुळ। वीस जोडया घृत निर्मळ। गुळ लवण तिखट डाळ। पाहिजे उत्तम मसाला ॥ ५४ ॥ सामान अवघें आज द्यावें। अखेर हिशोबासी यावें। आपुले दाम घेऊन जावें। नाहीं आम्हीं बुडविणार ॥ ५५ ॥ आजपासून आठवे दिवशीं। हिशोब चुकवूं निश्चयेंसी। आज तुम्हां द्यावयासी। नाहीं जवळी कपर्दिक ॥ ५६ ॥ उदमी म्हणती ते अवसरीं। हा भणंग दुबळा भिकारी। विश्वास ठेवून याचेवरी। सामान देणें न निर्भय ॥ ५७ ॥ परी घाला समजूत। कांहीं तरी सांगून सत्य। उगीच भरबाजारांत। अपमान याचा करूं नये ॥ ५८ ॥ ऐसा विचार करूनी। उदमी बोलिले मधुर वचनीं। इतुकें सामान ये स्थानीं। मिळणार नाहीं सर्वथा ॥ ५९ ॥ ऐकून उदम्याचें भाषण। श्रीधरमहाराज झाले खिन्न। आले घरीं कंटाळून। चिंतातूर बैसले ॥ ६० ॥ आतां इकडे काय झालें। तें पाहिजे श्रवण केलें। सांगतों बोबडया शब्दें भलें। क्षमा करा हो श्रोतेजन ॥ ६१ ॥ सत्य कराया भक्तवचन। दाशरथी सीता-रमण। जो सर्व व्यापी परिपूर्ण। महाउदार परमात्मा ॥ ६२ ॥ तो वाणी झाला सीतापती। सवें लक्ष्मण मारुती। येऊन राज-महेंद्रीप्रती। पाल मांडिलें बाजारीं ॥ ६३ ॥ जो आदिअनादि जगजेठी। सहस्र ब्रह्मांडें ज्याचे पोटीं। तो राजमहेंद्रीच्या हाटीं। येता झाला भक्तास्तव ॥ ६४ ॥ ज्याचा न कळे कोणा अंत। जो चिद्विलास रमानाथ। तो राजमहेंद्री शहरांत। येता झाला भक्तां-

स्तव ॥ ६५ ॥ सोडोनियां शेषशयन । नारद तुंबरांचें गायन। धांविन्नला नारायण । भक्तांसाठीं आपुल्या ॥ ६६ ॥ टाकूनियां पीत पीतांबर । नेसला कर्वती कांठी धोतर । किरीट टाकून डोईवर । अलम पगडी बांधिली ॥ ६७ ॥ रामानुजी गंध लाविलें। दाशरथी वाणी झाले । बाजारीं माल मांडिलें। किराण्याचें साक्षेप ॥ ६८ ॥ पाहून तें दुकान । चकित झाले अवघे जन। सूर्यापरी देदिप्यमान । कोण हे पुरुष कळेना ॥ ६९ ॥ यांतील हा थोरला। लाजवील मदनाला। पाहून यद्वदनाला । इंदु होयील शंकित ॥ ७० ॥ हा खचित कोणी थोर। मोठा असावा सौदागर। ऐसें जाणोनि साचार । उदमी आले भेटावया ॥ ७१ ॥ उदमी म्हणती कर जोडून। आहां आपण कोठील कोण। काय आपुलें नामाभिधान। हें सांगा आम्हाप्रती ॥ ७२ ॥ श्रीराम बोले त्यावरी। आम्ही आहोंत व्यापारी। वास्तव्य आमुचें त्रैलोक्यपुरीं। बिहारी राम नाम माझें ॥ ७३ ॥ एक लक्षाचे खालतीं । नामुचा व्यापार निश्चिती। तुमचे गांवची ऐकोन कीर्ती। आलों व्यापार करावया ॥ ७४ ॥ एक भाव देणें घेणें। अन्यथा न होय बोलणें। सचोटीनें वागणें। हा दुकानचा रिवाज ॥ ७५ ॥ ऐकून ऐशी हकीकत। उदमी झाले अवघे चकित। कोणीही न त्यांसी धजत। सौदा कराया कारण ॥७६॥ पहा कैसे अंध जन। जवळी असतां नारायण। वैकुंठपती भगवान। नाहीं कोणी ओळखिला ॥ ७७ ॥ जवळीं असतां चिंतामणी। जैसा लेखावा काचमणी। तोच प्रकार त्या स्थानीं। उदमी करिते जाहले ॥ ७८ ॥ तें अवघें वर्तमान। कळलें श्रीधरालागून। तात्काळ पेठेस येऊन। बिहारीसी भेटले ॥ ७९ ॥ संकल्प लक्षभोजनाचा। केला शेटजी येथ साचा। हिय्या न होत कोणाचा। मशीं द्याया सामान ॥ ८० ॥ ऐसें ऐकतां जगज्जीवन। बोलता झाला करुणाघन । आपणा अवघें सामान। देईन चिंता

करूं नका ॥ ८१ ॥ हा माझा बजरंग । आण ने करील सांग । उत्तम आला योग । तुमची सेवा करण्याचा ॥ ८२ ॥ आमुच्या पैशाची चुकोती । शेवटीं करावी निश्चिती । अवघ्या वस्तु आपणाप्रती । आम्ही पुरवूं येथूनी ॥ ८३ ॥ भांडीं भाजी सरपण । पान पत्रावळ सामान । मिळेल तुम्हां लागून । दुसरीकडे पाहूं नका ॥ ८४ ॥ ऐसें ऐकतां तद्भाषण । श्रीधर आनंदले पूर्ण । विन्हाडासी येऊन । तयारीसी लागले ॥ ८५ ॥ अवघें सामान मारुती । पुरविता झाला सत्वर गती । जेथें साह्य रमापती । तेथ उणें कोठून ॥ ८६ ॥ पहा पहा हो सुज्ञ चतुर । केवढा साधुचा आधिकार । वैकुंठींचा सकुमार । ज्यानें वसविला बाजारीं ॥ ८७ ॥ असो टिळे लाविले वेसीशी । राजमहेंद्रीं पंचक्रोशीसी । आमंत्रण चहूं वर्णासी । देते झाले महाराज ॥ ८८ ॥ समारंभ थोर झाला । भोजन पंचक्रोशीला । अबालवृद्ध तृप्त झाला । पावते झाले श्रोते हो ॥ ८९ ॥ आनंद झाला अवघ्यांसी । क्षेत्रस्थ नारीनरासी । वंदावया तो पुण्यराशी । जन धावूं लागले ॥ ९० ॥ श्रीधरानें भागवताचा । सप्ताह आरंभिला साचा । थाट झाला समाप्तीचा । धन अपार मिळालें ॥ ९१ ॥ नित्य भागवत श्रवणाप्रती । येत होता उन्मिळा पती । पंचक्रोशींत जन गाती । धवल यश श्रीधराचें ॥ ९२ ॥ समाप्तीचें होऊन धन । द्यावया दुकानदारालागून । सोडोनिया निजसदन । श्रीधर महाराज निघाले ॥ ९३ ॥ इकडे भगवान दाशरथी । रावणांतक प्रताप ज्योति । दुकान आटोपून निश्चिती । जावयासी निघाला ॥ ९४ ॥ उद्यम्यासी करी जयगोपाळ । पीत वसन घननीळ । उद्यमींहि मिळोनि सकळिक । सत्कार करिते जाहाले ॥ ९५ ॥ वाण्यास म्हणे सीतापति । तुम्ही अभागी निश्चिती । शहाजोग श्रीधराप्रती । भणंग कैसें ठरविलें ॥ ९६ ॥ त्यानें माझी चुकोती । केली आज निश्चिती । आतां जातों देशाप्रति । लोभ असूं द्या मजवरी ॥ ९७ ॥ ऐसें बोलोन अंतर्धान । पावता झाला जगज्जीवन । इकडे श्रीधर हाटीं

येऊन। दुकान शोधूं लागले ॥९८॥ परि दुकान आढळेना। पुसों लागलें वाण्यांना। विहारीचें होतें ना येथें दुकान आजवरी ॥९९॥ तें म्हणती दुकानदार। काल अवघ्या दिवसभर। येथें होते साचार। दुकान त्या विहारीचें ॥१००॥ गेला तो अस्तमानीं। आपुलीया ग्रामालागोनीं। आम्हांस त्यानें जातांनीं। जयगोपाळ ठोकिला ॥१०१॥ तुमचेकडील बाकी चुकती। मिळाली म्हणे मजप्रती। म्हणोन आतां निश्चितीं। रहाणें येथें योग्य नसे ॥१०२॥ ऐसें अवघ्यांस सांगून। गेला विहारी निघोन। तें अवघें ऐकोन। श्रीधर मनीं घोटाळला ॥१०३॥ म्हणे मनीं तो न विहारी। होता माझा रावणारी। माझें साह्य निर्धारीं। करण्या येथें प्रगटला ॥१०४॥ धन्य धन्य ही नगरी साची। पाऊलें लागली रामचीं। जी माय अनाथाची। भक्तवत्सल परमात्मा ॥१०५॥ हा हायरे श्रीरामा। कैवल्यदात्या पुरुषोत्तमा। आनंदकंदा आनंदधामा। कां रे कष्ट घेतले हे ॥१०६॥ धिक्कार असो मजप्रती। ज्यांचा माझा दाशरथी। तराजू देऊन हातीं। बाजारांत बैसविला ॥१०७॥ ज्याचें घ्यावया दर्शन। योगयोगादि साधन। करिताती तापसी जन। तो म्यां बसविला बाजारीं ॥१०८॥ वेद वर्णितां जयाप्रती। ह्मणूं लागला नेति नेति। ते पूर्ण ब्रह्म सांवळी मूर्ती। म्यां बाजारीं बसविली ॥१०९॥ महराज म्हणती उदम्यांस। तुम्ही पाहिलें रामास। तेणें आल्याचें जन्मास। सार्थक झालें तुमचें ॥११०॥ धन्य धन्य तुमचे नयन। दृष्टी पाहिला नारायण। धन्य धन्य तुमचें वदन। गोष्टी बोलला रामासी ॥१११॥ धन्य धन्य तुमचे श्रवण। रामाचें ऐकिलें भाषण। रामासी दिधलें आलिंगन। तेणें तुमची धन्य तनु ॥११२॥ चरणकमलें रामाचीं। या भूमीस लागलीं साचीं। तेणें सहस्र तीर्थांची। आली इशीं योग्यता ॥११३॥ प्रयाग अवंती पुष्कर। वाराणशी फल्गुतीर। ओंवाळून साचार। इजवरून

टाकावी ॥ ११४ ॥ चरणाचा केला आश्रय । तेणें ही धन्य भूमी माय । गेला माझा रामराय । येऊन या नगरीमधें ॥ ११५ ॥ काढूनियां वस्त्रासी । लोळूं लागले भूमीसी । घेऊनि तिथल्या मृत्तिकेसी । अंगासी फांसुं लागले ॥ ११६ ॥ हे पूर्ण ब्रह्मचिद्विलासा । राघवा रामा जगन्निवासा । सर्ववंद्या पुराणपुरुषा । कां रे उपेक्षा केली मम ॥ ११७ ॥ किंवा तुझ्या वैकुंठीं । जागा न उरली जगजेठी । मीं येतां होईल दाटी । म्हणून मजला उपेक्षिलें ॥ ११८ ॥ किंवा बीज पाण्याचें । भूमीवरी पाहिजे साचें । म्हणून बाहेर आंगाचे । मज-लागीं टाकिलें ॥ ११९ ॥ किंवा तव कृपेस दुष्काळ । पडला मज-विषयींच घननीळ । तुझ्यावांचून माझी आळ । कोण पुरवील नारा-यणा ॥ १२० ॥ फळें उष्टीं भिल्लिणीचीं । सेविलींस कीं रामा त्यांचि । भक्तवत्सलपणाची । कां होळी केलीस मग ॥ १२१ ॥ तुझें न झाल्या दर्शन । मीं येथेंच देईन प्राण । ब्रह्महत्या तुजलागून । घडेलही मायबापा ॥ १२२ ॥ याचा विचार करावा । सत्वरीं धांवें माधवा । सांवळें रूप दाखवा । अभिनव आपुलें मजप्रती ॥ १२३ ॥ तूं सर्व घटीं ओतप्रोत । हा अध्यात्माचा सिद्धांत । अध्यात्मज्ञान भागवतांत । उत्तमोत्तम कथियेलें ॥ १२४ ॥ त्याचें मीं करितों पारायण । म्हणून मशी अपरोक्ष ज्ञान । असेल ऐसेंच मानून । रामराय बसूं नका ॥ १२५ ॥ साखरभात बुंदी घेवर । जरी सेवित असला नर । परी लवण नसतां साचार । रुची न ये तयाची ॥ १२६ ॥ हे रामा आणून मनीं । दर्शन द्यावें चक्रपाणी । ऐसें महाराज बोलूनी । रडूं लागले धायधाय ॥ १२७ ॥ रात्रीचा तो समय झाला । श्रीधर न जाती विन्हाडाला । उदमी समूह कंटाळला । समजूत त्यांची घालून ॥ १२८ ॥ म्हणूं लागले व्यापारी । हा वेडा झाला निर्धारी । चला जाऊं आपुलीया घरीं । रात्र झाली दोन प्रहर ॥ १२९ ॥ उदमी अवघे निघोन गेले । कोणी न हाटीं राहिले । तो

निजपुत्राचा करीत आले। शोध दीक्षित ते ठायां ॥ १३० ॥ पाहू-
नियां श्रीधरासी। दीक्षित बोलती तयासी। दोनप्रहर झाली
निशी। कां न आलास गृहातें ॥ १३१ ॥ लोळशी या भूमीवरी। हा
काय प्रकार हें सांगावें सत्वर। मजलागीं पुत्रराया ॥ १३२ ॥
इत्थंभूत हकीगत। निवेदली पित्याप्रत। तों सीतापती रघुनाथ।
प्रगट झाला ते ठायीं ॥ १३३ ॥ देदीप्यमान सांवळी मूर्ति। धनुष्यबाण
शोभे हातीं। आपाद रुळे वैजयंति। उर्ध्व त्रिपुंड्र भाळीं असे
॥ १३४ ॥ पार्श्वभागीं लक्ष्मण। पुढें अंजनीनंदन। ऐशा त्रिवर्गासी
पाहून। श्रीधर परम संतोषला ॥ १३५ ॥ श्रीधरानें उठाउठी।
रामपदा घातली मिठी। जैसें मातेचिया कंठीं। बाळ मिठी मारि-
तसे ॥ १३६ ॥ जैसी पिपीलिका शर्करेस। न इच्छी सोडण्यास।
तैसें रामचरणास। न सोडी श्रीधर तेधवां ॥ १३७ ॥ हे वेदपुरुषा
पुरुषोत्तमा। सज्जनांच्या निवासधामा। निजभक्तांच्या कल्पद्रुमा।
तव दर्शनें धन्य मीं ॥ १३८ ॥ मज अभाग्यासाठीं। कां शिणलास
जगजेठी। राजमहेंद्रींच्या हाटीं। पाल कां मांडिलें रामराया
॥ १३९ ॥ ऐसें ऐकितां भक्तवचन। बोलता झाला रघुनंदन। तुझें
कराया सत्य वचन। वाणी झालों राजसा ॥ १४० ॥ योगक्षेम तुमचा।
मशीं वाहणें भाग साचा। मीं भुकेला भक्तीचा। भक्त माझे प्राण-
सखे ॥ १४१ ॥ जा आतां सुखें घरीं। माझा वास तव अंतरीं।
ऐसें बोलोन ठेविला शिरीं। वरदहस्त रामानें ॥ १४२ ॥ पितापुत्रास
दर्शन। देऊनियां रघुनंदन। पावता झाला अंतर्धान। नमन माझें
तयाला ॥ १४३ ॥ स्वस्ति श्री संतकथामृत। श्रीधरा भेटला रघुनाथ।
हा इतिहास ऐकितां दुरित। पळेल म्हणे दासगणू ॥ १४४ ॥ श्रीहरि-
हरार्पण मस्तु ॥ शुभंभवतु ॥

॥ इति एकविंशोऽध्यायः समाप्तः ॥

# अध्याय २२

श्रीगणेशायनमः ॥ ०ंनमोजी विघ्नहरा । मूषकारूढ फरशुधरा । शूर्पकर्णा लंबोधरा । भालचंद्रा पाव मसी ॥ १ ॥ मागिलाध्यायीं निरूपण । पंचक्रोशीस भोजन । श्रीधरांनीं घालून । येते झाले निजदेशा ॥२॥ उत्सवाची तयारी । कंदकुर्तीत केली खरी । भिंती रंगविल्या नानापरी । काढून चित्रें असंख्य ॥ ३ ॥ मंडप उभारिले द्वारापुढें । गोमयाचे घातिले सडे । मन्दिराच्या चौंहीकडे । दिव्य पताका उभारिल्या ॥ ४ ॥ पंचवृक्षाचे पल्लव । बांधिलीं तोरणें अभिनव । कंदकुर्तीचे लोक सर्व । आनंदसागरीं बुडाले ॥ ५ ॥ छतें लाविलीं बहुता परी । तैशाच नाना झालरी । चौघडा झडे चहूं प्रहरीं । ध्वनी मधुर सनयांचे ॥ ६ ॥ शास्त्री पुराणिक हरिदास । येते झाले उत्सवास । तया कंदकुर्ती ग्रामास । गौतमीतटीं साजिरें ॥ ७ ॥ प्रातःकालीं सुवासिनी । येती मन्डपालागूनी । चैत्रांगणें काढूनी । कौतुक दाविती चित्रांचें ॥ ८ ॥ ध्वजारोपणाचे दिवशीं । अभिषेक करिती रामासी । आणून गंगोदकासी । शुचिर्भूत होऊनिया ॥ ९ ॥ पंचसूक्त पवमान । म्हणती ब्राह्मण विद्वान् । अभिषेक धारा धरुन । स्नान घालिती रामचंद्रा ॥ १० ॥ भरजरीचा पितांबर । शिरीं मुगुट मनोहर । हिरेपाच ज्याच्यावर । जडविले असती कुशलत्वें ॥ ११ ॥ किनखापाचा अंगरखा । रामाप्रती घालिती देखा । तेणें वैकुंठनायका । शोभा येत विशेष ॥ १२ ॥ मौक्तिक हार कंठांत । कडीं पोच्या हातांत । रत्नमुद्रिका बोटांत । घातिल्या रामचंद्राच्या ॥१३॥ मुगुटावरी कलगी तुरा । कानीं चौकडा साजिरा । कंबरपट्टा शोभे बरा । रत्नजडित कटीवरी ॥ १४ ॥ सीतामाईस पैठणी । नारळी पदरी अंजिरी जाणी । जियेचें तेज पाहुनी । विद्युल्लता लज्जित ॥१५॥ कंचुकी घातली अंगांत । काप मुगड्या कानांत । पांच तुऱ्याची शोभे नथ । मातुश्रीच्या नासिकीं ॥१६॥ मूद राखडी शोभे शिरीं । पिंपळपान बिजोरा

त्यावरी । गोठ तोडे पाटल्या करीं । द्वयदंडीं बाजुबंद ॥१७॥ वाक्या शोभती कोपरावरी । गळ्यांमाजी भव्य सरी। माळांची न करवे खरी। गणती श्रीते मजलागीं ॥१८॥ पुतळ्याजवे बोरमाळ । कंठा चंद्राहार सोज्वळ । हरपर रेवड्या एकावळ । टिका चिंच पेट्या ठुशा ॥ १९ ॥ पायीं सांखळ्या शोभती । तोरड्या वाळे गर्जती । रामचंद्रा- चियेप्रती । पोशाख लक्ष्मणाचा ॥ २० ॥ केशरयुक्त चंदन । केलें असे विलेपन। भृकुटीमाजीं मृगलांछन । कृष्ण वर्ण तिलक शोभे ॥२१॥ कुंकुम- तिलक लाविला भालीं । तेणें शोभे जगन्माउली । जी निजकृपेची साउली । करी आपुल्या भक्तांवर ॥२२॥ नाना जाती सुमन हार । बकुल- शेवंती कल्हार । गुलाब जाई मांदार । बाण मालती निशिगंध ॥ २३ ॥ कुंदकोन्हांटी मोगरा । गुलाब चापा साजिरा । रोमतुळ- शीच्या मंजीरा ॥ घवघवीत कंठीं शोभती ॥ २४ ॥ अगरु सार चंदनाचा । धूप तेथें लाविला साचा । सुवास सुटला उद्- बत्तीचा । दर्वळलें मंदिर ॥ २५ ॥ फुलवाती विष्णुवाती । बोटवाती वैकुंठवाती । यांही करून सीतापती । ओवाळिती भक्त ते ॥ २६ ॥ बुंदी फेण्या मोतीचूर । जिलब्या करंज्या घीवर । पुरी चिरोटा शिरा खीर । यांचा नैवेद्य दाविती ॥ २७ ॥ गुलाबपाणी हिना अर्गजा । भक्त लाविती अधोक्षजा । यथासांग करूनी पूजा । विडा- दक्षणा अर्पिती ॥ २८ ॥ मन्त्र पुष्पांजली वाहोन । नवरात्र स्थापना करती जाण । अस्तमानी निंबलोण । करिती बाया रामातें ॥ २९ ॥ प्रत्येक दिवशीं एकेकवर्णा । महाराज देती भोजना । भाविक जन प्रदक्षणा । घालूं लागती पंक्तीसीं ॥३०॥ पंक्तीचा न वर्णवे थाट । गुलाल युक्त रांगोळ्या पाट । उदबत्त्यांचे घमघमाट । जेवण्या पानें केळीचीं ॥ ३१ ॥ सूर्य येतां माध्यान्हीसी । पंगत बैसे भोजनासी । ऐसा थाट प्रतिदिवशीं । होत नवमी पर्यंत ॥ ३२ ॥ भोजन चहूं वर्णासी । देती महा- राज आदरेसी । तें पाहून कित्येकांसी । विषाद त्याचा वाटला ॥ ३३ ॥

# वर्गणीदारांकरितां

१ श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याचे अंकापासून आहे. नवीन वर्गणीदारांस वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२ पत्ता बदलणें झाल्यास लगेच आम्हांस कळवावें. बदललेला पत्ता न कळविल्यामुळें कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

३ अंकासंबंधी पत्रव्यवहार आमचेकडे करावा.

४ लेखासंबंधी पत्रव्यवहार संपादक व प्रकाशकांकडे करावा.

# वार्षिक वर्गणी.

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनिऑर्डरनें आगाऊ रु. ३।०, व्ही. पी. नें रु. ३॥, फुटकळ अंक ।०, मागील अंकास शिल्लक असल्यास ०॥-

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला**

# लेखकांकरितां

१. श्रीसाईलीलेंत प्रसिद्धीसाठी पाठविलेला लेख अथवा कविता कागदाच्या एका बाजूवर, मार्जिन सोडून, सुवाच्य बाळबोध लिपींत असावी. पेन्सिलीनें किंवा कागदाचे दोन्हीं बाजूस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

२. लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसिद्ध न करितां टोपण नांवाखाली प्रसिद्धी व्हावयाची असल्यास त्याप्रमाणें कळवावें.

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पसंती अगर नापसंती कळविली जाईल. पसंती कळविल्यानंतर, आम्हांस कळविल्याशिवाय लेखकांनीं तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमचेकडे राहील. येईल तसा शब्दशः प्रसिद्ध करण्याची हमी आम्ही घेत नाहीं.

५. लेखासोबत पुरेसें पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं.

प्रकाशक **श्रीसाईलीला**

"दक्षिणा प्राइझ कमिटीनें बक्षिस दिलेला व केसरी, चित्रमयजगत्, ज्ञानप्रकाश, विविधज्ञानविस्तार, व रत्नाकर वगैरे वृत्तपत्रें व मासिकांनीं उत्कृष्ट अभिप्राय दिलेला असा संतकवि ह. भ. प. **श्री दासगणू महाराज** यांनीं नवीन रचिलेला व प्रोफेसर श्री. नी. चाफेकर, M. A., LL. B. यांनीं प्रस्तावना लिहिलेला नवीन ग्रंथ

## श्री पासष्टी–भावार्थ दीपिका

हा **नरेंद्र बुक डेपो दादर,** मुंबई येथें मिळेल.

**कापडी प्रत १० आणे.** **साधी प्रत ८ आणे.**

**सर्व प्रकारचे मेंदूचे विकारांवर जागरण व मानसिक श्रम करणाऱ्यांस अत्यंत उपयोगी**

नकलेबद्दल ] **ब्राह्मी तेल** [ सावध राहावें.

**बाळबाळंतिणीकरितां औषधें**

**बाळंत काढा नं. १** पहिल्या दहा दिवसांचा ०।१४; **बाळंत काढा नं. २** दहा दिवसानंतर ०।१४; **बाळकडूः**—मूल जन्मल्यापासून देण्यास योग्य ०।८; **कुमारी आसव** लहान मुलांकरितां ०।१२.

**सतत २५ वर्षे लोकादरास पात्र झालेलें, कोणत्याही ऋतूंत घेण्यास योग्य, अत्यंत मधुर व आरोग्यदायक**

एक रत्तल १।०।० दीड रत्तल २।०।४ ) **द्राक्षासव** ( अर्धा रत्तल ०।१४ ट. ख. वे. नि.

शिवाय आमचे कारखान्यांत टिकाऊ तयार काढे, आसवें, अरिष्टें, भस्में वगैरे ५०० वर औषधें तयार आहेत. त्यांचे माहितीचा मोठा क्याटलाग व प्रकृतिमान भरून पाठविण्याकरितां "रुग्ण–पत्रिका" ही सात आण्यांचीं तिकिटें आलीं असतां पाठवूं.

**दत्तात्रय कृष्ण सांडू ब्रदर्स** आर्यौषधी कारखाना, चेंबूर जि. ठाणें.

टे. नं. ८७०२४ × २२२७८. दुकान दवाखाना, ठाकुरद्वार, **मुंबई** नं० २

**पुणें:—श्री साईनाथ** आणि **कंपनी.**

हें पुस्तक श्रीलक्ष्मीनारायण छापखाना, ३६४ ठाकुरद्वार, मुंबई येथें **अनंत आत्माराम मोरमकर** यांनीं छापून रा. आ. तर्खड यांनी ५ सेंट मार्टिन्स रोड, वांद्रे येथें प्रसिद्ध केलें.